**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.**

शुक्रवार दि. २२.१.२०१६ रोजी सायं ०४.०० वाजता नांवामनपा स्थायी समितीची सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थाई समितीचे सदस्य उपस्थित होते.

**सौ. अनुजा अमितसिंह तेहरा, सभापती**

सर्वश्री

| | |
|---|---|
| मोरे संजय गंगाधर | अन्नेवार गंगासागर संदिप |
| इंदूबाई शिवाजीराव घोगरे | विनयकुमार गुर्रम |
| संगिता पृथ्वीराज राओत्रे | ज्योती महेंद्र खेडकर |
| शर्मा पुष्पाताई राजेश | कदम गंगाबाई नारायण |
| चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह | फारुख हुसेन कासीम साब |
| जकीया बेगम स. मुखतार | |

**सभापती** सर्व प्रथम उपस्थित सर्व स.सदस्य, श्री सुशिल खोडवेकर आयुक्त, श्री प्रकाश येवले, प्र. उपआयुक्त, श्री विजयकुमार मुंडे, प्र.उपआयुक्त, श्री आर.एस.कोलगणे मुख्य लेखा परिक्षक, डॉ. आसिफ प्र. मुख्य वैद्यकिय अधिकारी, श्री म.सादीक मुख्य लेखाधिकारी, श्री गिरीष कदम कार्यकारी अभियंता,श्री सुग्रीव अंधारे,कार्यकारी अभियंता व सर्व क्षेत्रिय अधिकारी व विभाग प्रमूख यांचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामकाजास सुरवात करण्यात येते.

**विनय गुर्रम** मागील सभेत जे ठराव पारीत करण्यात आले जी चर्चा झाली त्यावर सबंधित अधिका-यांनी काय कार्यवाही केली याची माहिती सभागृहास देण्यात यावी.

**सभापती** मागील सभेत व्यापा-यांना व्यवसायचे परवाना देण्याच्या संदर्भात निर्णय घेण्यात आला होता त्या अनुषंगाने सर्वे करण्यात आलेला आहे काय स्थायी समिती मध्ये स.सदस्य ज्या सुचना करतात त्याची सबधित अधिका-यांनी नोंद घेवून पुढील सभेत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल द्यावयास पाहिजे. विभाग प्रमुखांनी काय काय कामे केली याचा अहवाल देण्यात यावा.

**आयुक्त** परवान्या देण्याच्या संदर्भात सर्व क्षेत्रिय अधिका-यानी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल द्यावा.मागील सभेत शहरात नोंदणीकृत ६२४२ व्यापारी असून त्यापैकी ३०९० व्यापा-यानी परवाना काढलेला आहे ३१५२ व्यापा-यानी परवाना काढलेला नाही अशी माहिती देण्यात आली होती, ज्या व्यापा-यानी परवाना काढलेला नाही त्यांना परवाना काढण्यासाठी नोटीसा दिल्या का ते सांगावे.

**क्षेत्रिय अधिकारी अ** ज्या व्यापा-यानी व्यवसाय परवाना काढलेला नाही त्यांना नोटीसा देण्याकरीता स्वच्छता निरिक्षंकाना सांगण्यात आलेले आहे.

**संजय मोरे** एक महिण्यापुर्वी दुकानांना परवाना देण्याचे संदर्भात चर्चा झाली होती. माझ्या प्रभागात किती दुकाने आहेत त्यापैकी किती दुकानदारांनी परवाने काढले किती दुकानदारांनी परवाने काढले नाहीत याची यादी क्षेत्रिय अधिका-याकडे यादी आहे काय असे ती दाखविण्यात यावी.

**विनय गुर्रम** आम्ही शहर विकास कामाच्या संदर्भात सुचना करतो त्याप्रमाणे कार्यवाही झाली पाहिजे.

**आयुक्त** सर्व विभाग प्रमुखांना ताकीद देण्यात येत आहे की, सभागृहात मोघम स्वरुपाचे उत्तर देवू नये. स.सदस्यांनी ज्या सुचना केल्या जे ठराव पारीत करण्यात आले त्याची नोंद घेवून त्याप्रमाणे कार्यवाही झाली पाहिजे, खरोखरच कार्यवाही केली असेल तर स्पष्ट सांगावे, कार्यवाही केली नसेल तर माफी मागून या कामाकरीता वेळ मागवुन घेण्यात यावा. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल नगरसचिवाकडे/सभापती,स्थायी समिती यांना देत जावा.

**सभापती** सर्व विभाग प्रमुखांनी स्थायी समितीच्या सभेत पुर्व तयारीने येत जावे. मी मागील स्थायी समितीच्या सभेत सांगितल्या प्रमाणे क्षेत्रिक कार्यालय ब आणि क ला भेट दिली त्या ठिकाणी मला ज्या बाबी आढळून आल्या त्याची माहिती आयुक्त साहेबांना दिली त्यांनी डायरी काढून त्या सर्व बाबींची नोंद घेतलेली आहे. आयुक्त साहेब नोंद घेतात तर आपण अशा प्रकारची नोंद का घेत नाहीत, डायरीत नोंद करणेची सर्वानी सवय लावून घ्यावी. मागील सभेत दिलेल्या सुचनांची व निर्णयाची नोंद घेवून त्यावर काय कार्यवाही केली याचा लेखी अहवाल देत जावा. .तोडी उत्तर देण्यात येवू नये ही सर्वाना शेवटची वार्नींग आहे.

**नगरसचिव** वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी साप्तजाहिक अहवाल खालील प्रमाणे दिलेला आहे

| अ.क्र. | विभागाचे नांव | अहवाल |
|---|---|---|
| १ | साथरोगाची सध्यस्थिती | नांदेड शहरा मध्ये गॅस्ट्रोचे ११ रुग्ण आढळून आले आहेत |
| २ | धुरीकरणाचे वेळापत्रक | एक धुरीकरण मशिन चालु आहे डेंग्यु दुष्ज्ति रुग्णाच्या घरी व परिसरा मध्ये धुरीकरण करण्यात येते तसेच विशेष अधिकारी व पदाधिकारी व स. सदस्य यांच्या निवासस्थानी धुरीकरण करण्यात येते.१ जानेवारी २०१६ पासुन डेंग्यु संशयीत खाजगी लॅबमधील रुग्णाची संख्या ३ आहे |

| | | |
|---|---|---|
| ३ | फिरते रुग्णालयाचे वेळापत्रक | सकाळी ०९ ते दुपारी ०१ वाजे पर्यंत |
| ४ | आरोग्य संबंधीचे इतर साप्ताहिक अहवाल | दि. १७ जानेवारी ते २३ जानेवारी पर्यंत नांदेड मनपा क्षेत्रात पल्स पोलीओ माहिम राबविण्यात येत आहे. |

**विनय गुर्रम** एवढया मोठया शहराकरीता एकच धुरीकरणाची मशिन वापरण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.ऍक्च्युल धुरीकरणाच्या किती मशिन आहेत.

**मलेरिया अधिकारी** महानगरपालिकेकडे धुरीकरणासाठी १५ मशिन असून त्या सर्व कार्यरत आहे. शासनाने दिलेल्या निर्देषानूसार ज्या ज्या भागात डेंग्यूचे रुग्ण आढळून येतात त्या भागात धुरीकरणाचे मशिनव्दारे धुरीकरण करण्यात येते. शहरात डेग्युचे प्रमाण वाढले तर तर या १५ मशिनव्दारे विशेष मोहिमे अंतर्गत शहरात धुरीकरण करण्यात येते.

**आयुक्त** डासांच्या प्रतिबंधाकरीता धुरीकरण करण्यात येते, यामूळे जिवाणू(बॅक्ट्रीया व्हायरस) मरतात परंतु केमिकल धुरीकरणामूळे प्रदुषण वाढते, लहान मुलांच्या व नागीकांच्या आरोग्यावर परिणाम होतो, त्यामूळे शासनाने डेंग्युची साथ सुरु झाली असेल तरच धुरीकरण करावे अशा प्रकारचे निर्देष दिलेले आहेत त्यामूळे शासकीय रुग्णालय व खाजगी रुग्णालयातील अहवालानूसार ज्या भागात डेंगूचे मलेरियाचे जास्त रुग्ण आढळून येतात त्या भागात मलेरिया प्रतिबधात्मक धुरीकरण करण्यात येते. डेंग्युच्या वैद्यकिय उपचारासाठी शासकीय व खाजगी दवाखान्यात जवळपास ७० टक्के रुग्ण हे महानगरपालिका हध्दीबाहेरचे असतात.जे ९ डेग्युचे संशयित रुग्ण आढळून आलेले आहे ते शहरा बाहेरीत आहेत.महानगरपालिकेकडून नागरीकांच्या आरोग्याची काळजी घेण्यात येते. केंद्र शासनाच्या एनयुएचएम अंतर्गत पिवळी गिरणी, विनायकनगर, जूना कौठा याठिकाणी दवाखाने मंजुर असून दवाखान्याच्या इमारतीचे बांधकामासाठी निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. निविदा मंजुरीचा प्रस्ताव पुढील स्थायी समितीच्या सभेत ठेवण्यात येईल. हे तिन्ही रुग्णालयाचे बांधकाम त्वरीत करुन नागरीकाना आरोग्याच्या सुविधा उपलब्ध्द करुन देण्यात येईल.

**संजय मोरे** प्रभागात फक्त महानगरपालिकेचे मजुर सफाईचे काम करतात कंत्राटदाराची मजुर साफसफाई करीत नसल्याचे दिसून येते.

**उमेश चव्हाण** प्रत्येक क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत साफसफाईच्या कामासाठी किती पुरुष मजुर स्त्रि मजुर देण्यात आले त्याची माहिती देण्यात यावी. आमच्या प्रभागात साफसफाईच्या कामासाठी फक्त २-३ मजूर येतात.

**विनय गुर्रम** साफसफाईच्या कामासाठी एकूण किती मजुर काम करतात त्यामध्ये एटूझेडचे मजुर किती व महानगरपालिकेचे मजुर किती याची लेखी माहिती मागीतली परंतु मला अद्याप पर्यत माहिती देण्यात आलेली नाही.

**आयुक्त** मागील सभेत असे ठरले होते की, श्री विनय गुर्रम यांना संचिकेतील माहिती पहावयाची असेल तर ती त्यांना पहाणेसाठी उपलब्ध्द करुन द्यावी.त्यांना संचिकेतील कागदपत्राच्या सत्यप्रती पाहिजे असेल तर माहिती अधिकार कायद्या अंतर्गत कागदपत्राची झेरॉक्स प्रत काढण्यासाठी जो काही खर्च येतो त्याप्रमाणे झेरॉक्सचा खर्च घेवून त्यांना माहिती देण्यात यावी. श्री उमेश चव्हाण व श्री विनय गुर्रम यांनी सांगितल्या प्रमाणे प्रत्येक क्षेत्रिय कार्यालय/प्रभागात साफसफाईचे कामासाठी द्यावयाची मजुरांची संख्या कोण ठरवितो. शहरातील साफसफाईची जबाबदारी ही प्रथम महानगरपालिकेच्या मजुरांची आहे. मागील चार वर्षापासून शहरातील जमा झालेला कचरा उचलणे, नालीतील काढलेला गाळ कचरा उचलणे व तो डम्पींग ग्रांवुंडवर नेवून टाकणेचे कामासाठी एटूझेड कंपनीला कंत्राट देण्यात आलेले आहे.आणि एटूझेडशी केलेल्या करारनाम्याप्रमाणे स्वच्छता निरिक्षकांनी मागणी केल्या नुसार एटूझेडने मजुरांचा पुरवठा करणे असे आहे. प्रभागातील साफसफाई करण्यासाठी मजुरांची संख्या कशा प्रकारे निश्चित करण्यात आलेली आहे,प्रभागाचे क्षेत्रानुसार की गरजेनुसार मजुरांची संख्या निश्चित करण्यात येते , कंत्राटदाराची बिले कशी देण्यात येतात याची माहिती देण्यात यावी. प्रत्येक वेळी एटूझेडचे मजूर काम करीत नाहीत अशा प्रकारच्या तक्रारी येत आहे.परंतु त्याचे कचरा उचलण्याचे काम केंव्हा सुरु होते महानगरपालिकेच्या मजुरांनी रस्त्यांची साफसफाई केल्यानंतर जमा केलेला कचरा व नालीतील काढलेला गाळ काढल्यानंतर सकाळी ८-९ वाजेपासून सुरु होते.

**संजय मोरे** पुढच्या सभेत प्रत्येक क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत साफसफाईच्या कामासाठी एटूझेडचे व महानगरपालिकेचे किती पुरष/स्त्री मजूर देण्यात आलेले आहेत,त्यांचेवर नियंत्रण ठेवण्यासाठी किती अधिकारी देण्यात आलेले आहेत.साफसफाईच्या कामाचे वाटप कशा प्रकारे करण्यात आलेले आहे याची सविस्तर माहिती देण्यात यावी. स्वच्छता निरिक्षकाकडे साफसफाईचे कामाची तक्रार केली की दोन मजुर फावडे घेवून येतात दुस-यानी तक्रार केली की ते मजुर तिकडे जातात.

**आयुक्त** क्षेत्रिय अधिका-यांनी/स्वच्छता निरिक्षकांनी साफसफाईच्या संदर्भात किती तक्रारी आल्या त्यापैकी किती तक्रारीची पुर्तता केली, एटूझेडने किती टन कचरा उचलला याचा अहवाल सबंधित प्रभागाच्या नगरसेवकाना देणे अपेक्षित आहे. एटूझेडला सन २०१२-२०१३ पासून कचरा उचलण्याचे कंत्राट देण्यात आलेले आहेत .२०१२-२०१३ पासून महानगरपालिकेचे किती मजुर सेवानिवृत झाले,किती मजुरांनी स्वेच्छा निवृत्ती घेतली किती मृत्यू पावले व त्यांच्या बदल्यात एटूझेड कंपनीकडून किती मजुरांचा पुरवठा करण्यात येतो,एटूझेडशी करार काय झालेला आहे

हा स.सदस्यांचा प्रश्न आहे, ही माहिती तयार करण्यात यावी, पुरवठा करण्यात आलेल्या मजुरांना नियमानुसार रु.४०००/-चे पेमेंट देण्यात येते किंवा नाही हेही पाहणे आवश्यक आहे. मजुरांची तक्रार आहे की आम्हाला फक्त पावणे चार हजार पेमेंट करण्यात येते.केलेल्या कराराप्रमाणे त्यांना पेमेंट करणे आवश्यक आहे.त्याप्रमाणे पेमेट देण्यात यावे.

**विनय गुर्रम** नगरसेवकांच्या दबावाखाली त्यांचे प्रभागात जास्तीचे मजुर देण्यात येतात जे नगरसेवक तक्रार करीत नाहीत त्यांचे प्रभागात मजुर कमी देण्यात येतात म्हणजे काही प्रभागात ५० मजुर काम करतात तर काही प्रभागात फक्त २-४ मजुर काम करतात.

**आयुक्त** काही प्रभागाचे क्षेत्र मोठे आहे परंतु लोकसंख्या विरळ आहे त्याठिकाणी रस्ते, नाल्या नसतात घराचे प्रमाणे कमी असते त्यामूळे अशा प्रभागात जास्त मजूर देण्याची आवश्यकता नाही.

**उमेश चव्हाण** श्री संजय मोरे यांनी सुचविल्याप्रमाणे प्रत्येक प्रभागाकरीता किती मजुर देण्यात आलेले आहेत त्याची सविस्तर माहिती स्थायी समितीच्या सदस्यांना देण्यात यावी.

**आयुक्त** सर्व क्षेत्रिय अधिका-यांनी साफसफाईच्या कामांसाठी स्वच्छता निरिक्षक निहाय महानगरपालिकेचे किती मजुर देण्यात आलेले आहेत ,एटूझेड कंपनीचे किती मजुर देण्यात आलेले आहे, महानगरपालिकेच्या कोणकोणत्या अधिका-यांच्या, पदाधिका-याच्या घरी किती मजुर काम करतात त्याची माहिती स्थायी समितीच्या सदस्यांना देण्यात यावी.

**फारुख हुसेन** माझ्या प्रभागात रजानगर चौक ते कब्रस्थान पर्यत व मच्छी मार्केट ते श्री रज्जाक साहेब याचे घरापर्यत पाण्याची पाइप लाईन टाकणेसाठी कंत्राटदारास कामाचे आदेश देण्यात आलेले आहे परंतु कंत्राटदार हे काम करण्यास तयार नाही. प्रभागात पाण्याची टंचाई असल्यामूळे सदरील काम एएमआरसी अंतर्गत कंत्राटदाराकडून मंजुर दरावर करुन घेण्यात यावे मंजुर दरावर कंत्राटदार काम करण्यास तयार आहे.

**आयुक्त** आपल्या प्रभागातील पाणी पुरवठा पाईप लाईन टाकण्याचे काम करण्यात येईल. सीआय, जीआय पाईप उत्पादक कंपनीकडे पाइपची मागणी जास्त असल्यामूळे कंपनी पाईपचे पुर्ण पेमेंट केल्याशिवाय कंत्राटदारास पाईप पुरवठा करीत नाही त्यामूळे कंत्राटदार जीआय व सिआय पाईप लाईन टाकण्यासाठी पाईप खरेदी करण्याकरीता अग्रीम रक्कमेची मागणी करीत आहे. कंत्राटदरास पाईप खरेदी करण्यासाठी अग्रीम रक्कम देण्या सारखी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नाही.जसे जसे पैसे येतील त्यापमाणे कंत्राटदारास देयके देण्यात येत आहे. ज्या कंत्राटदारस काम देण्यात आलेले आहे त्यांच कंत्राटदाराकडून हमदर्दीने प्राधान्याने आर्थिक परिस्थितीनुसार काम करुन घ्यावे लागणार आहे. पाणी पुरवठा पाईप लाईन टाकण्यासाठी कंत्राटदाराचे मटेरियल व पाईप खरेदी करण्यासाठी ७० टक्के खर्च होतो व ३० टक्के खर्च हा तांत्रीक कामाकरीता व मजुरांचे पेमेंट करीता होतो. मागील दोन वर्षापासुन एएमआरसी अंतर्गत प्रतिवर्ष पाणी पुरवठा, मलनिस्सारण व रस्ते दुरुस्तीकरीता ३० कोटीची कामे करुन घेतलेली आहे.त्यांची देयके प्रलंबित आहेत. सध्या आर्थिक परिस्थती खराब असल्यामूळे आपण त्यावरील खर्च कमी करुन यावर्षी एएमआरसी अंतर्गत पाणी पुरवठा व मलनिस्सारण व रस्ते दुरुस्तीकरीता प्रत्येकी ४ कोटी याप्रमाणे १२-१३ कोटीची कामे केलेली आहेत ही देयके प्रलंबित आहेत. देयके देण्यास उशिर होत असला तरी कंत्राटदार कामे करीत आहेत त्यामूळे एका कंत्राटदाराचे काम काढून दुस-या कंत्राटदारास देणे योग्य नाही.

**विनय गुर्रम** मागील सभेत शहरातील खाजगी ओपन प्लॉटधारका विरुध्द कार्यवाही करणे बाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येईल अशी चर्चा झाली होती.नगरसचिवानी शहरातील अशा ओपने स्पेसधारका विरुध्द आय.पी.सी.कलमानुसार कार्यवाही करता येते असे सांगितलेले आहे.

**उमेश चव्हाण** महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनूसार आपण संबंधित ओपन प्लॉटधारकांना नोटीस देवून त्यांचे विरुध्द दंडात्मक कार्यवाही करु शकतो.

**नगरसचिव** महानगरपालिका अधिनियमात ओपन प्लॉटधारका विरुध्द कार्यवाही करण्याचे अधिकार नाहीत.आय.पी.सी.नुसार कार्यवाही करण्याचे अधिकार आहेत असे मी सांगितले होते.

**आयुक्त** संबधित ओपन प्लॉटधारकांना नोटीसा देण्यात आलेल्या आहेत.

**विनय गुर्रम** नोटीसा देण्यात आल्या परंतु त्याचे उत्तर ते देत नाही कार्यवाही करीत नाही.कायदेशिर त्यांचे विरुध्द कार्यवाही व्हावी.

**आयुक्त** स्थायी समितीमध्ये झालेल्या चर्चे प्रमाणे महानगरपालिका अधिनियमात ओपन प्लॉट धारकाविरुध्द कार्यवाही करण्याची काही तरतूद आहे काय याचा शोध घेतला परंतु त्यामध्ये खाजगी ओपन प्लॉटधारका विरुध्द कार्यवाही करण्याची कुठेच तरतूद नाही. महानगरपालिका अधिनियम किंव शासन नगरविकास विभागाचे काही जीआर असेल तर आपण सांगावे व त्याप्रमाणे ठराव पारीत करण्यात यावा. ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. आय.पी.सी.कलमानुसार कार्यवाही करण्याचे अधिकार जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी यांना आहेत. महानगरपालिका आयुक्तांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ व एमआरटिपी ॲक्ट १९६६ या कायद्या शिवाय इतर कोणत्याही कायद्याची अमलबजावणी करण्याचे अधिकार नाहीत.

**विनय गुर्रम** मागील सभेत श्री जाधव अभियंता यांची तक्रार केली होती त्यांना नियमाप्रमाणे नोटीस देण्यात येईल असे सांगण्यात आले होते परंतु अद्याप त्यांना नोटीस देण्यात आलेली नाही.

**आयुक्त** संबंधितास कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. माहिती अधिकारात आपण सदरील कारणे दाखवा नोटीसची प्रत अस्थापना विभागातून घ्यावी.

**संजय मोरे** मालमत्ता कर आकारणी विभागातून एक परिपत्रक काढण्यात आलेले आहे.यामध्ये नागरीकांना जन्म मृत्यू प्रमाणपत्र हे संबंधितांनी मालमत्ता कर भरल्याची पावती दाखविल्यानंतरच देण्यात यावे असे नमूद आहे यामूळे नागरीकांची खुप मोठी गैरसोय होत आहे. जे बाहेरगावचे नागरीक आहेत ज्यांचे नावावर मालमत्ताच नाही तर ते मालमत्ता कर कसे भरतील,एका परिवारातील चार पाच भाऊ वडीलांच्या किंवा नातेवाईकांच्या घरात राहतात परंतु सदरील मालमत्ता त्यांच्या नावावर नाही त्यांना जन्म मृत्यूचे प्रमाणपत्र हवे असेल तर ते त्या घराचा कर कसा भरतील, शहराबाहेरील नागरीकांचा अपधाती/दवाखान्यात मृत्यू झाला तर त्यांचे मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे,त्याची मालमत्ता नांदेड शहरात नसेल तर ते मालमत्ता कर भरल्याची पावती पावती कशी काय दाखवतील. त्यामूळे या परिपत्रकातून जन्म मृत्यू प्रमाणपत्र वगळण्यात यावे अशी आमची मागणी आहे.

**उमेश चव्हाण** वडीलाचे नांवावर मालमत्ता असेल परंतु वडीलांनी त्यांना बेदखल केलेले असल्यामूळे मुले दुस-यांच्या घरात किरायाने रहात असतील तर ते वडीलांच्या नावांवर असलेल्या मालमत्तेचा कर कसा काय भरतील.

**आयुक्त** सध्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खराब असल्यामूळे व मालमत्ता कराची वसुलीचे प्रमाण नगन्य असल्यामूळे कराची वसुली वाढविण्याकरीता परिपत्रक काढावे लागले. जे नागरीक जन्म मृत्यूचे प्रमाणपत्र देण्याकरीता अर्ज सादर करतात त्यावेळी त्यांचेकडून ओळखपत्राचे पुरावे मागविण्यात येते, जसे आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधा पत्रिका,पॅनकार्ड ई.त्यावर सबंधिताचा राहण्याचा पत्ता असतो जर पत्ता महानगरपालिका हध्दीत बाहेर असेल तर त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून मालमत्ता कर भरल्याची पावती मागण्याचा प्रश्नच येत नाही, त्यांना जन्म मृत्यूचे प्रमाणपत्र देण्यात येते.नांदेड शहरात खाजगी व शासकीय दवाखान्यात डिलेव्हरी करीता शहराच्या बाहेरील अनेक स्त्रिया येतात रुग्णालयात त्यांचा पत्ता नांदेडचा नसतो त्यांच्या मुला मुलीचे जन्माचे प्रमाणपत्र देण्यासाठी मालमत्ता कर भरल्याची पावती मागण्यात येत नाही. हीच बाब मृत्यू प्रमाणपत्राबाबत आहे. महानगरपालिका अधिनियातील तरतूदीनूसार जे भाडेकरु, भोगवटादार आहेत त्यांचेकडूनही मालमत्ता कराची वसुली करण्याचा अधिकार आहे. महानगरपालिका हध्दीत जे नागरीक ज्या घरात राहतात त्या घराचा मालमत्ता कर भरणे हे त्यांचे कर्तव्य आहे.

**उमेश चव्हाण** महानगरपालिका अधिनियमात भाडेकरु कडून मालमत्ता कराची वसुल करण्याची तरतूद आहे काय

**विनय गुर्रम** अधिनियमातील तरतूद दाखविण्यात यावी.

**आयुक्त** घरमालका बरोबर भाडेकरुंचा जो ११ महिण्याचा भाडेकरार होतो त्यामध्ये महागनरपालिकेचा मालमत्ता कर ,विज बिल, पाणी पटी घरमालकांनी भरावी की, भाडेकरुंनी भरावी याची जबाबदारी निश्चित करण्यात येते.व ज्यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली त्यांनी कर भरवयाचा असतो. महानगरपालिका अधिनियमात भोगबटदारा कडून भाडेकरुकडून मालमत्ता करची वसुली करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे.भाडेकरुनी मालमत्ता कर भरावा व किरायामधून तो कपात करावा.

**विनय गुर्रम** फार थोडे लोक भाडेकरार करतात मध्यम वर्गीय ,गरीब लोक भाडेकरु भाडेकरार करीत नाही.

**संजय मोरे** आम्हाला ठराव घेण्याचे अधिकार आहेत मी आयत्यावेळी या परिपत्रकातून जन्म व मृत्यू प्रमाणपत्र विना अट देण्यात यावे अशा प्रकारचा प्रस्ताव मांडत आहे.

**आयुक्त** स्थायी समितीला ठराव घेण्याचे अधिकार असल्यामूळे स्थायी समितीला जो काही ठराव पास करावयाचा आहे तो पास करावा.

**(यानंतर श्री संजय मोरे यांनी सभागृह सोडले)**

**अन्नेवार गंगासागर** मागील सभेत मी अनाधिकृत बांधकामाची तक्रार केली होती संबंधिता विरुध्द काय कार्यवाही करण्यात आली.

**विनय गुर्रम** शहरात मोठया प्रमाणात अनाधिकृत बांधकामे होत असून या अनाधिकृत बांधकामधारक विरुध्द काहीच कार्यवाही होत नाही.

**आयुक्त** शहरात जवळ पास ७० टक्के घरे ही अनाधिकृत व विनापरवानगीने बांधण्यात आलेली आहे.यामध्ये लोकप्रतिनिधीची सुध्दा घरे आहेत. अनाधिकृत बांधकामे दोन प्रकारचे होतात. काही नागरीक बांधकाम सुरु करतात व इमारत निरिक्षकांनी अनाधिकृत बांधकामाचा पंचनामा केल्यानंतर केलेले बांधकाम नियमित करण्यासाठी हार्डशिप, गुंठेवारी मध्ये अर्ज सादर करतात याचे ७० टक्के प्रमाण आहे.काही नागरीक बांधकाम परवानगीसाठी अर्ज सादर करुन परवानगी मिळेल या अपेक्षेने बांधकाम सुरु करतात, तेव्हा सबंधितांना बांधकाम थांबविण्यासाठी इमतारत निरिक्षका मार्फत नोटीसा देण्यात येतात. काही अनाधिकृत बांधकामा बाबत इमारत निरिक्षक अनाधिकृत बांधकामाचा पंचनामा करतात परंतु ते संबंधिता विरुध्द कार्यवाही करण्यासाठीचे संचिका आयुक्तांकडे सादर करीत नाहीत ते आपल्यास्तरावर प्रलंबित ठेवतात ही वस्तुस्थिती आहे. आयुक्तांकडे अनाधिकृत बांधकामाची संचिका येत नाही तेव्हा अशा अनाधिकृत बांधकाम विरुध्द काय कार्यवाही करावी हे सांगावे

सौ.अन्नेवार मॅडमने अनाधिकृत बाधंकाम करणा-या ज्याव्यक्तीचे नाव दिलेले आहे त्यांना नियमानुसार नोटीस देण्यात आलेली आहे त्यांचे बांधकाम अनाधिकृतही म्हणता येणार नाही किंवा नियमानुसारही म्हणता येणार नाही. कारण संबंधितांनी आपले बांधकाम नियमित करण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. शासन निर्णयानुसार ज्यांनी अनाधिकृत बांधकाम केलेले आहे किंवा करीत आहेत त्यांना महानगरपालिकेस अर्ज देवून बांधकाम गुठेंवारी किंवा हार्डशिप प्रिमियम भरुन नियमीत करता येते.व तश्या प्रकारचे अर्ज नागरीकांकडून येत आहेत. नियमात बसणारी बांधकामे गुंठेवारी किंवा हार्डशिप प्रिमियम वसुल करुन नियमित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहेत. अशा प्रकारच्या जवळपास २४० संचिका मान्यतेसाठी माझ्याकडे आलेल्या आहेत. अनाधिकृत बांधकामधारका विरुध्द प्रशासनामार्फत कार्यवाही करण्यात येत नाही अशी शंका असेल तर तक्रारकर्त्यास विनापरवानगीने बांधकाम करणा-या व्यक्तीविरुध्द न्यायालय जाण्याचा अधिकार आहे.

**विनय गुर्रम** इमारत निरिक्षक अनाधिकृत बांधकामा विरुध्द कार्यवाही करीत नाहीत.

**आयुक्त** घराचे बाधंकाम करण्यासाठी महानगरपालिकेची बांधकाम परवानगी घेण्याची व मंजुर नकाशानुसार बांधकाम करण्याची जबाबदारी संबंधीत नागरीकांची आहे. होत असलेले बांधकाम हे परवानगीने होत आहे किंवा नाही विना परवानगीने बांधकाम होत असेल तर अनाधिकृत बांधकामाचे पंचनामे करुन सादर करणे एवढी जबाबदारी इमारत निरिक्षकाची आहे.

**सभापती** सौ.अन्नेवार मॅडम यांनी केलेल्या तक्रारी प्रमाणे संबंधित अनाधिकृत बांधकामधारकास एमआरटिपी ऍक्ट मधील तरतूदीनूसार नोटीस देण्यात आल्याचा खुलासा आयुक्त साहेबांनी केलेला आहे, आता विषय पत्रिकेवर चर्चा करण्यात यावी.

**नगरसचिव** प्रशासना मार्फत अभिनंदानाचा प्रस्ताव आहेत त्यास मान्यता देण्यात यावी.

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात राबविण्यात येणा-या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) साठी राज्य अभियान संचालनालय व त्या अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन कक्षाची निर्मिती शासन निर्णय क्रं. स्वभाअ २०१५/प्र.क्र.२३/ नवि-३४, दिनांक २४ एप्रिल २०१५ अन्वये या महानगरपालिकेने केलेली असून सदरचे शासन निर्णयानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने शहरातील स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, मुख्य शाखा शिवाजीनगर नांदेड आणि Axis Bank Lrd (IFS Code-UTIB0000318) कलामंदिर, नांदेड या बँकांचे जनरल मॅनेजरशी संपर्क करुन त्यांना केंद्र सरकार आणि महाराष्ट्र शासनाचे स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) मध्ये सहभागी करुन घेतले या दोन्ही बँकांपैकी स्टेट बँक ऑफ हैद्राबाद नांदेड यांनी (५००) टी शर्ट महानगरपालिकेचा लोगो आणि **SBH** बँकेचा लोगो प्रिंट करुन स्वच्छता अभियानात सहभागी होणा-या कर्मचा-यांसाठी उपलब्ध करुन दिले तसेच Axis Bank, नांदेडने स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) या अभियानात सहभाग नोंदवून विशेष स्वच्छता मोहिमेसाठी सहभागी कर्मचा-यांकरिता टी शर्ट करिता रु. १,९६,०००/- चा धनादेश (डी.डी. क्रं. १९१४१ दिनांक २०.०१.२०६) न्यु अहेमदाबाद स्पोर्टस डेमो मुंबई यांचे नांवे दिला.स्टेट बँक ऑफ हैद्रारबाद आणि Axis Bank या दोन्ही बँकांनी भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाच्या आणि नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या आवाहनास अनुसरुन स्वच्छता अभियान अंतर्गत विशेष स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविल्याबद्दल या दोन्ही बँकांचे अभिनंदन करण्याचा प्रस्ताव आहे.

**उमेश चव्हाण** दोन्ही बॅकेचे अभिनंदनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**विनय गुर्रम** या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**सभापती** .स्टेट बँक ऑफ हैद्रारबाद आणि Axis Bank या दोन्ही बँकांनी भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाच्या आणि नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या आवाहनास अनुसरुन स्वच्छता अभियान अंतर्गत विशेष स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविल्याबद्दल या दोन्ही बँकांचे अभिनंदन करण्याचा अत्यंत चांगला प्रस्ताव आयुक्त साहेबांनी दिलेला आहे त्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं.१९१** **ठराव**

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात राबविण्यात येणा-या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) साठी राज्य अभियान संचालनालय व त्या अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन कक्षाची निर्मिती शासन निर्णय क्रं. स्वभाअ २०१५/प्र.क्र.२३/ नवि-३४, दिनांक २४ एप्रिल २०१५ अन्वये या महानगरपालिकेने केलेली असून सदरचे शासन निर्णयानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने शहरातील स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, मुख्य शाखा शिवाजीनगर नांदेड आणि Axis Bank Lrd (IFS Code-UTIB0000318) कलामंदिर, नांदेड या बँकांचे जनरल मॅनेजरशी संपर्क करुन त्यांना केंद्र सरकार आणि महाराष्ट्र शासनाचे स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) मध्ये सहभागी करुन घेतले या दोन्ही बँकांपैकी स्टेट बँक ऑफ हैद्राबाद नांदेड यांनी (५००) टी शर्ट महानगरपालिकेचा लोगो आणि **SBH** बँकेचा लोगो प्रिंट करुन स्वच्छता अभियानात सहभागी होणा-या कर्मचा-यांसाठी उपलब्ध करुन दिले तसेच Axis Bank, नांदेडने स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) या अभियानात सहभाग नोंदवून विशेष स्वच्छता मोहिमेसाठी सहभागी कर्मचा-यांकरिता टी शर्ट करिता रु. १,९६,०००/- चा धनादेश (डी.डी. क्रं. १९१४१ दिनांक २०.०१.२०६) न्यु अहेमदाबाद स्पोर्टस डेमो मुंबई यांचे नांवे दिला.

स्टेट बँक ऑफ हैद्राराबाद आणि Axis Bank या दोन्ही बँकांनी भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाच्या आणि नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या आवाहनास अनुसरुन स्वच्छता अभियान अंतर्गत विशेष स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविल्याबद्दल या दोन्ही बँकांचे अभिनंदन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची स्थायी समितीची ही सभा सर्वानुमते करते या प्रस्तावाचे इतिवृत्त याच सभेत कायम करते.

**विषय क्रं. ०१**

दिनांक २७.११.२०१५, ०९.१२.२०१५ विशेष सभा, १८.१२.२०१५ व २३.१२.२०१५ रोजी मागील झालेल्या इतिवृत्त कायम करणे बाबत.

**ज्योती खेडकर** — आयुक्तांचे निवासस्थानाची यापुर्वी केंव्हा दुरुस्ती करण्यात आली होती. याची सविस्तर माहिती देण्यात यावी.अशी मागणी केली होती प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा अशी मी मागणी केलेली नव्हती त्यामूळे दि.२७.११.२०१५ रोजी झालेल्या सभेतील ठराव क्र.१६८ मध्ये दुरुस्ती करुन याप्रस्तावास मान्यता देण्यात यावी असा माझा प्रस्ताव आहे. दुरुस्तीस मान्यता देण्यात यावी.

**उमेश चव्हाण** — सौ.ज्योती खेडकर यांनी सुचविलेल्या दुरुस्ती प्रमाणे दि.२७.११.२०१५ रोजी झालेल्या सभेतील ठराव क्र.१६८ मध्ये दुरुस्ती करण्यास मान्यता देण्यात यावी.

**सभापती** — सौ.ज्योती खेडकर यांनी सुचविल्या प्रमाणे दि.२७.११.२०१५ रोजी झालेल्या सभेतील ठराव क्र. १६८ मध्ये दुरुस्ती करुन सदरील सभेचे इतिवृत्त कायम करण्यास तसेच दि.०९.१२.२०१५ विशेष सभा, १८.१२.२०१५ व २३.१२.२०१५ रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्तास कायम करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं.१९२** **ठराव**

दिनांक २७.११.२०१५ रोजी झालेल्या स्थायी समितीच्या सभेतील ठराव क्र. १६८ मध्ये नांदेड वाघाळा शहर महानगरालिका हद्दीत स्नेहनगर येथील मा. आयुक्त यांच्या निवासस्थानाची दुरुस्तीचे काम करण्यात आले त्यास कार्योत्तर मान्यता देण्याचा प्रस्ताव सविस्तर माहितीसह पुढील स्थायी समिती समोर ठेवण्यात यावा या ऐवजी **नांदेड वाघाळा शहर महानगरालिका हद्दीत स्नेहनगर येथील मा. आयुक्त यांच्या निवासस्थानाची दुरुस्तीचे काम करणेसाठी** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उपअभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी केली असता सदरचे काम करणे आवश्यक असून सदर कामासाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादर सुची २०१४-१५ नुसार **रुपये ३,७९,६००/-** चे अंदाजपत्रक सादर करुन सदर काम **माझा कंन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडुन करुन घेण्यात आले.कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर माझा कंन्सट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास मुं. प्रा. मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते अशी दुरुस्ती करुन दि.२७.११.२०१५ रोजी झालेल्या व दि.०९.१२.२०१५ विशेष सभा, १८.१२.२०१५, दि.२३.१२.२०१५ रोजी झालेल्या मागील सभेच्या इतिवृत्तास कायम करण्यास ही नांवामना स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते.

**विषय क्रं.०२**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत **प्रभाग क्रं. ७ मध्ये तथागतनगर भागात श्री कवठेकर ते इबीतवार यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता व आर.सी.सी. नाली करणेसाठी** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी केली असता सदरचे काम करणे आवश्यक असून सदर कामासाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादरसुची २०१४-१५ नुसार **रुपये १,९४,७००/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम **एल. अन्ड एस. कन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले.

कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर **एल. अन्ड एस. कन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च **रुपये १.९४.७००/-** यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठी प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** — आयुक्तांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.१९३** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत **प्रभाग क्रं. ७ मध्ये तथागतनगर भागात श्री कवठेकर ते इबीतवार यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता व आर.सी.सी. नाली करणेसाठी** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी केली असता सदरचे काम करणे आवश्यक असून सदर कामासाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादरसुची २०१४-१५ नुसार **रुपये १,९४,७००/-** चे अंदाजपत्रक तयार करुन सदर काम **एल. अन्ड एस. कन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले.

कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर **एल. अन्ड एस. कन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च **रुपये १.९४.७००/-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरी ही नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.०३**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) व (ड) अन्वये नोंद घेणे बाबत.

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/पापु/१०८६६/१५ दिनांक २६.११.२०१५ नुसार मनपा हद्दी मध्ये **हिंगोली गेट पासुन ते क्रेशर रोड पर्यंत राजिंग मेन पाईप लाईन मधुन दोन ठिकाणाचे लिकेजेसची दुरुस्ती करण्यासाठी** उप अभियंता पापुजनि यांनी अहवालासह सादर केलेले अंदाजपत्रक दिनांक ०३.१०.२०१५ नुसार सदरील ठिकाणी दोन लिकेजेसची दुरुस्ती करणे करिता अहवाल सादर केलेले अंदाजपत्रक **रुपये**

**१,५९,२६४/-** (अक्षरी रुपये एक लक्ष एकोणसाठ हजार दोनशे चौसाष्ट फक्त) ला मा. आयुक्त यांना प्रदान अधिकारानुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यात आली सदरील काम **इन्द्रजा कन्सट्रक्शन उस्मानाबाद** यांच्याकडून करुन घेण्यात आले असुन सदरील कामावर एकूण झालेला खर्च रुपये १,५९,२६४/- संबंधीतास देयक अदायी करण्यास मान्यता देण्यात आली.

सदरील खर्च मनपा अंदाजपत्रक सालसन २०१५-१६ च्या संबंधीत पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती या लेखा शिर्षकातुन करण्यात यावा.

**सभापती** आयुक्तांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.१९४** **ठराव**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) व (ड) अन्वये कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/पापु/ १०८६६/१५ दिनांक २६.११.२०१५ नुसार मनपा हद्दी मध्ये **हिंगोली गेट पासुन ते क्रेशर रोड पर्यंत राजिंग मेन पाईप लाईन मधुन दोन ठिकाणाचे लिकेजेसची दुरुस्ती करण्यासाठी** उप अभियंता पापुजनि यांनी अहवालासह सादर केलेले अंदाजपत्रक दिनांक ०३.१०.२०१५ नुसार सदरील ठिकाणी दोन लिकेजेसची दुरुस्ती करणे करिता अहवाल सादर केलेले अंदाजपत्रक **रुपये १,५९,२६४/-** (अक्षरी रुपये एक लक्ष एकोणसाठ हजार दोनशे चौसाष्ट फक्त) ला मा. आयुक्त यांना प्रदान अधिकारानुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यात आली सदरील काम **इन्द्रजा कन्सट्रक्शन उस्मानाबाद** यांच्याकडून करुन घेण्यात आले असुन सदरील कामावर एकूण झालेला खर्च रुपये १,५९,२६४/- संबंधीतास देयक अदायी करण्यास मान्यता देण्यात आली असुन सदरील खर्च मनपा अंदाजपत्रक सालसन २०१५-१६ च्या संबंधीत पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती या लेखा शिर्षकातुन करण्यात आलेला असुन सदरील आदेशाची नोंद ही नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते घेते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.०४**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका **पाणी पुरवठा व मलनिस्सारण झोन क्रमांक B मध्ये** उपअभियंता पापुवजनि विभाग मनपा नांदेड यांनी सादर केलेल्या अहवालानुसार स्थानिक बाजार दराप्रमाणे कामाची तातडी गरजा व आवश्यकता पाहता **मे. सोहेल कन्सट्रक्शन अन्ड स्टिल वर्कस नांदेड** यांच्याकडून **झोन B मधील ४२ हातपंप दुरुस्त करुन घेण्यात आले** आहे त्यास **रुपये २,९९,५१५/-** (अक्षरी रुपये दोन लाख नव्यानव हजार पाचशे पंधरा फक्त) चा खर्च झालेला आहे.

करिता सदर प्रस्तावास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर कार्योत्तर प्रशासकिय आर्थीका मान्यतेस्तव सादर.

**उमेश चव्हाण** प्रभागातील ना दुरुस्त असलेले हातपंम्प दुरुस्त करण्यासाठी सांगितले तर कंत्राटदाराचे देयक देण्यास आलेले नसल्यामूळे कंत्राटदार हातपंप दुरुस्त करीत नाहीत अशा प्रकारचे सांगण्यात येते त्यामूळे हातपप दुरुस्तीचे पेमेंट त्वरीत करण्यात यावे जेणे करुन नागरीकांना पाणी टंचाईच्या काळात पाणी मिळू शकेल.

**सभापती** मागील सभेत कोणकोणत्या प्रभागातील हातपंप दुरुस्त करण्यात आले त्याची माहिती देण्यात यावी असे ठरले त्याप्रमाणे माहिति देण्यात यावी.

**आयुक्त** एप्रिल मे महिण्यात शहरात पाण्याची टंचाई होण्याची शक्यता आहे त्यामूळे पाण्याची बचत होण्याच्या दृष्टीकोनातून शहरातील सर्व हातपम्पाची व सबमर्सिबल पंपाची प्राधान्याने दुरुस्ती करण्यात यावी व सबंधित कंत्राटदाराचे देयक वेळेवर देण्यासाठी सबंधित विभागानी दक्षता घ्यावी. हातपंप दुरुस्तीची देयके प्रलंबित ठेवण्यात येवू नये. तसेच जे हातपंप दुरुस्त करण्यात आले त्याचा अहवाल नगरसचिवा मार्फत स्थायी समितीला द्यावा.

**सभापती** आयुक्तांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.१९५** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका **पाणी पुरवठा व मलनिस्सारण झोन क्रमांक B मध्ये** उपअभियंता पापुवजनि विभाग मनपा नांदेड यांनी सादर केलेल्या अहवालानुसार स्थानिक बाजार दराप्रमाणे कामाची तातडी गरजा व आवश्यकता पाहता **मे. सोहेल कन्सट्रक्शन अन्ड स्टिल वर्कस नांदेड** यांच्याकडून **झोन B मधील ४२ हातपंप दुरुस्त करुन घेण्यात आले** आहे त्यास **रुपये २,९९,५१५/-** (अक्षरी रुपये दोन लाख नव्यानव हजार पाचशे पंधरा फक्त) चा खर्च झालेला आहे. करिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय आर्थीका मान्यता ही नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.०५**

मनपा हद्दीत **प्रभाग क्रं. ३० अंतर्गत इतवारा भागात अस्तित्वात असलेल्या बोअरवेल मध्ये पॉव्हर पम्प व पाईप्स टाकण्कयात आले** सदरील काम **मे. दिलीप इलेक्ट्रीकल्स नांदेड** यांच्याकडून करुन घेवुन त्यास प्रत्यक्ष खर्च **रुपये ६५,६९२/-** खर्च झालेला आहे त्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरीस्तव स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** आयुक्तांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.१९६** **ठराव**

मनपा हद्दीत **प्रभाग क्रं. ३० अंतर्गत इतवारा भागात अस्तित्वात असलेल्या बोअरवेल मध्ये पॉव्हर पम्प व पाईप्स टाकण्कयात आले** सदरील काम **मे. दिलीप इलेक्ट्रीकल्स नांदेड** यांच्याकडून करुन घेवुन त्यास प्रत्यक्ष खर्च **रुपये ६५,६९२/-** खर्च झालेला आहे त्यास महाराष्ट्र

महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरी ही नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.०६**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड अंतर्गत विविध विभागाचे संरक्षण करण्यासाठी कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/७९७६/१४ दिनांक २३.०७.२०१४ अन्वये **मे. कलोटी, सिक्युरीटी सर्व्हिसेस नागपुर** यांनी पुरवठा केलेले (५२) सुरक्षारक्षकांच्या सेवेस माहे ०१.०५.२०१४ ते ३०.०४.२०१५ या कालावधीसाठी पुर्वीच्याच अटी व शर्तीच्या अधिन राहुन मुदतवाढ देण्यात आली सदर आदेशाची नोंद स्थायी समिती सभेत घेण्यात आली.

उपरोक्त मे. कलोटी सिक्युरीटी सर्व्हिसेस नागपुर यांनी पुरवठा केलेल्या सुरक्षारक्षकांची मुदतवाढ दि. ३०.४.१५ रोजी संपली असल्यामुळे नविन सुरक्षारक्षक पुरवठा करण्यासाठी ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेली असुन सदर प्रक्रिया पुर्ण होवुन नवीन सुरक्षा एजन्सीकडून पुरवठा करण्यात आलेल्या सुरक्षारक्षकांच्या नियुक्तीस कालावधी लागणार असल्यामुळे दिनांक ०१.०५.१५ ते ३१.०५.१५ या कालावधीसाठी कार्यालयीन प्रस्ताव क्रं. जा.क्रं. नावाशमनपा/साप्रवि/१७७३/१४५ दि. ११.०५.१५ अन्वये दिनांक ०१.०६.१५ ते ३०.०६.१५ या कालावधीसाठी कार्यालयीन प्रस्ताव क्रं. साप्रवि/२९८०/१५ दि. ०२.०६.१५ अन्वये व दि. ०१.०७.१५ ते दि. ३१.०७.१५ या कालावधीसाठी कार्यालयीन प्रस्ताव क्रं. सारपवि/४९९८/१५ दि. १५.७.१५ अन्वये मे. कलोटी सिक्युरीटी सर्व्हिसेस नागपुर यांनी पुरवठा केलेल्या सुरक्षारक्षकांच्या सेवेस मुदतवाढ देण्यासाठी प्रस्ताव स्थायी समिती सभेसमोर निर्णयास्तव ठेवण्यात आले होते त्यानुसार स्थायी समिती मनपा नांदेड यांचे आयोजीत बैठक दि. ३०.७.१५ ठराव क्रं ५६, ५७ व १०३ अन्वये उक्त (०३) ही महिण्याच्या मुदतवाढीस मंजुरी देण्यात आलेली आहे. तथापि नव्याने ई-निविदा सुचना क्रं. साप्रवि/ई-निविदा/८०७७/१५ दिनांक २२.०९.१५ अन्वये मागविण्यात आलेल्या सुरक्षारक्षकांच्या नियुक्ती प्रक्रिया पुर्ण न झाल्यामुळे दिनांक ०१.०८.१५ ते ३१.१०.१५ या कालावधीसाठी कार्यालयीन प्रस्ताव क्रं. साप्रवि/९३२२/१५ दि. १९.१०.१५ अन्वये मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव स्थायी समिती सभेसमोर निर्णयास्तव ठेवण्यात आले आहे.

तथापि ई-निविदा सुचना क्रं. साप्रवि/ई-निविदा/८०७७/१५ दि. २२.०९.१५ अन्वये नव्याने मागविण्यात आलेल्या सुरक्षारक्षकांच्या नियुक्तीची प्रक्रियया अंतिम टप्प्यात असल्यामुळे सदर नियुक्तीस प्रशासकिय कारणास्तव कालावधी लागत असल्यामुळे **मे. कलोटी सिक्युरिटी सर्व्हिसेस नागपुरच्या सुरक्षारक्षकांच्या सेवेस पुर्वीच्याच अटी व शर्तीनुसार दि. ०१.११.१५ ते ३१.१२.१५ या दोन महिण्याच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याकरिता प्रस्ताव स्थायी समिती सभेसमोर निर्णयास्तव सादर.**

<u>प्रशासकिय टिप्पणी</u>

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड अंतर्गत विविध विभागाचे संरक्षण करण्यासाठी कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि /७९७६/१४ दिनांक २३.०७.२०१४ अन्वये **मे. कलोटी, सिक्युरीटी सर्व्हिसेस नागपुर** यांनी पुरवठा केलेले (५२) सुरक्षारक्षकांच्या सेवेस माहे ०१.०५.२०१४ ते ३०.०४.२०१५ या कालावधीसाठी पुर्वीच्याच अटी व शर्तीच्या अधिन राहुन मुदतवाढ देण्यात आली सदर आदेशाची नोंद स्थायी समिती सभेत घेण्यात आली.

उपरोक्त मे. कलोटी सिक्युरीटी सर्व्हिसेस नागपुर यांनी पुरवठा केलेल्या सुरक्षारक्षकांची मुदतवाढ दि. ३०.४.१५ रोजी संपली असल्यामुळे नविन सुरक्षारक्षक पुरवठा करण्यासाठी ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेली असुन सदर प्रक्रिया पुर्ण होवुन नवीन सुरक्षा एजन्सीकडून पुरवठा करण्यात आलेल्या सुरक्षारक्षकांच्या नियुक्तीस कालावधी लागणार असल्यामुळे दिनांक ०१.०५.१५ ते ३१.०५.१५ या कालावधीसाठी कार्यालयीन प्रस्ताव क्रं. जा.क्रं. नावाशमनपा/साप्रवि/१७७३/१४५ दि. ११.०५.१५ अन्वये दिनांक ०१.०६.१५ ते ३०.०६.१५ या कालावधीसाठी कार्यालयीन प्रस्ताव क्रं. साप्रवि/२९८०/१५ दि. ०२.०६.१५ अन्वये व दि. ०१.०७.१५ ते दि. ३१.०७.१५ या कालावधीसाठी कार्यालयीन प्रस्ताव क्रं. सारपवि/४९९८/१५ दि. १५.७.१५ अन्वये मे. कलोटी सिक्युरीटी सर्व्हिसेस नागपुर यांनी पुरवठा केलेल्या सुरक्षारक्षकांच्या सेवेस मुदतवाढ देण्यासाठी प्रस्ताव स्थायी समिती सभेसमोर निर्णयास्तव ठेवण्यात आले होते त्यानुसार स्थायी समिती मनपा नांदेड यांचे आयोजीत बैठक दि. ३०.७.१५ ठराव क्रं ५६, ५७ व १०३ अन्वये उक्त (०३) ही महिण्याच्या मुदतवाढीस मंजुरी देण्यात आलेली आहे. तथापि नव्याने ई-निविदा सुचना क्रं. साप्रवि/ई-निविदा/८०७७/१५ दिनांक २२.०९.१५ अन्वये मागविण्यात आलेल्या सुरक्षारक्षकांच्या नियुक्ती प्रक्रिया पुर्ण न झाल्यामुळे दिनांक ०१.०८.१५ ते ३१.१०.१५ या कालावधीसाठी कार्यालयीन प्रस्ताव क्रं. साप्रवि/९३२२/१५ दि. १९.१०.१५ अन्वये मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव स्थायी समिती सभेसमोर निर्णयास्तव ठेवण्यात आले आहे.

तथापि ई-निविदा सुचना क्रं. साप्रवि/ई-निविदा/८०७७/१५ दि. २२.०९.१५ अन्वये नव्याने मागविण्यात आलेल्या सुरक्षारक्षकांच्या नियुक्तीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्यामुळे सदर नियुक्तीस प्रशासकिय कारणास्तव कालावधी लागत असल्यामुळे **मे. कलोटी सिक्युरिटी सर्व्हिसेस नागपुरच्या सुरक्षारक्षकांच्या सेवेस पुर्वीच्याच अटी व शर्तीनुसार दि. ०१.११.१५ ते ३१.१२.१५ या दोन महिण्याच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणे योग्य राहील.**

**सभापती** आयुक्तांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.१९७** ठराव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड अंतर्गत विविध विभागाचे संरक्षण करण्यासाठी कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/७९७६/१४ दिनांक २३.०७.२०१४ अन्वये **मे. कलोटी, सिक्युरीटी सर्व्हिसेस नागपुर** यांनी पुरवठा केलेले (५२) सुरक्षारक्षकांच्या सेवेस माहे ०१.०५.२०१४ ते ३०.०४.२०१५ या कालावधीसाठी पुर्वीच्याच अटी व शर्तीच्या अधिन राहुन मुदतवाढ देण्यात आली सदर आदेशाची नोंद स्थायी समिती सभेत घेण्यात आली.

उपरोक्त मे. कलोटी सिक्युरीटी सर्व्हिसेस नागपुर यांनी पुरवठा केलेल्या सुरक्षारक्षकांची मुदतवाढ दि. ३०.४.१५ रोजी संपली असल्यामुळे नविन सुरक्षारक्षक पुरवठा करण्यासाठी ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेली असुन सदर प्रक्रिया पुर्ण होवुन नवीन सुरक्षा

एजन्सीकडून पुरवठा करण्यात आलेल्या सुरक्षारक्षकांच्या नियुक्तीस कालावधी लागणार असल्यामुळे दिनांक ०१.०५.१५ ते ३१.०५.१५ या कालावधीसाठी कार्यालयीन प्रस्ताव क्रं. जा.क्रं. नावाशमनपा/साप्रवि/१७७३/१४५ दि. ११.०५.१५ अन्वये दिनांक ०१.०६.१५ ते ३०.०६.१५ या कालावधीसाठी कार्यालयीन प्रस्ताव क्रं. साप्रवि/२९८०/१५ दि. ०२.०६.१५ अन्वये व दि. ०१.०७.१५ ते दि. ३१.०७.१५ या कालावधीसाठी कार्यालयीन प्रस्ताव क्रं. सारपवि/४९९८/१५ दि. १५.७.१५ अन्वये मे. कलोटी सिक्युरीटी सर्व्हिसेस नागपुर यांनी पुरवठा केलेल्या सुरक्षारक्षकांच्या सेवेस मुदतवाढ देण्यासाठी प्रस्ताव स्थायी समिती सभेसमोर निर्णयास्तव ठेवण्यात आले होते त्यानुसार स्थायी समिती मनपा नांदेड यांचे आयोजीत बैठक दि. ३०.७.१५ ठराव क्रं ५६, ५७ व १०३ अन्वये उक्त (०३) ही महिण्याच्या मुदतवाढीस मंजुरी देण्यात आलेली आहे. तथापि नव्याने ई-निविदा सुचना क्रं. साप्रवि/ई-निविदा/८०७७/१५ दिनांक २२.०९.१५ अन्वये मागविण्यात आलेल्या सुरक्षारक्षकांच्या नियुक्ती प्रक्रिया पुर्ण न झाल्यामुळे दिनांक ०१.०८.१५ ते ३१.१०.१५ या कालावधीसाठी कार्यालयीन प्रस्ताव क्रं. साप्रवि/९३२२/१५ दि. १९.१०.१५ अन्वये मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव स्थायी समिती सभेसमोर निर्णयास्तव ठेवण्यात आले आहे.

तथापि ई-निविदा सुचना क्रं. साप्रवि/ई-निविदा/८०७७/१५ दि. २२.०९.१५ अन्वये नव्याने मागविण्यात आलेल्या सुरक्षारक्षकांच्या नियुक्तीची प्रक्रियया अंतिम टप्प्यात असल्यामुळे सदर नियुक्तीस प्रशासकिय कारणास्तव कालावधी लागत असल्यामुळे **मे. कलोटी सिक्युरिटी सर्व्हिसेस नागपुरच्या सुरक्षारक्षकांच्या सेवेस पुर्वीच्याच अटी व शर्तीनुसार दि. ०१.११.१५ ते ३१.१२.१५ या दोन महिण्याच्या कालावधीसाठी मुदतवाढ ही नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.**

**विषय क्रं.०७**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत नागरी **दलीत वस्ती सुधार योजना अंतर्गत प्रभाग क्रं. २३ मध्ये गोयल यांचे घर ते नंदलाल ते श्री ढवळे यांच्या घरा पर्यंत तसेच ढवळे यांचे घर ते श्री कांबळे यांच्या घरा पर्यंत आरसीसी नाली व सिसि रस्ता करणेसाठी रुपये ३९,९९,२३४/-** साठी ई-टेंडर सेल व्दारे निविदा सुचना क्रं. साबांवि/१०१२५/२०१५ दिनांक ०४.११.२०१४ अन्वये दै. उद्याचा मराठवाडा या वर्तमानपत्रात दिनांक ०६.११.२०१५ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली असता उपरोक्त कामासाठी एकूण ३ निविदा प्राप्त झाले प्राप्त निविदा त्रीसदस्यीय समिती समोर दिनांक २३.१२.२०१५ रोजी उघडण्यात आले असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेले दर |
|---|---|---|
| **०१** | **कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड** | **अंदाजपत्रकीय दराने** |
| ०२ | सोहेल कन्सट्रक्शन नांदेड | ९% जास्त दर |
| ०३ | स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड | ७% जास्त दर |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन ती अंदाजपत्रक दराची आहे.

करिता नागरी **दलीत वस्ती सुधार योजना अंतर्गत प्रभाग क्रं. २३ मध्ये गोयल यांचे घर ते नंदलाल ते श्री ढवळे यांच्या घरापर्यंत तसेच ढवळे यांचे घर ते श्री कांबळे यांच्या घरापर्यंत आरसीसी नाली व सिसि रस्ता करणेसाठी कामारीकर कंन्स्ट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजुरीस्तव** सदरचा प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** आयुक्तांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.१९८** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत नागरी **दलीत वस्ती सुधार योजना अंतर्गत प्रभाग क्रं. २३ मध्ये गोयल यांचे घर ते नंदलाल ते श्री ढवळे यांच्या घरा पर्यंत तसेच ढवळे यांचे घर ते श्री कांबळे यांच्या घरा पर्यंत आरसीसी नाली व सिसि रस्ता करणेसाठी रुपये ३९,९९,२३४/-** साठी ई-टेंडर सेल व्दारे निविदा सुचना क्रं. साबांवि/१०१२५/२०१५ दिनांक ०४.११.२०१४ अन्वये दै. उद्याचा मराठवाडा या वर्तमानपत्रात दिनांक ०६.११.२०१५ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली असता उपरोक्त कामासाठी एकूण ३ निविदा प्राप्त झाले प्राप्त निविदा त्रीसदस्यीय समिती समोर दिनांक २३.१२.२०१५ रोजी उघडण्यात आले असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेले दर |
|---|---|---|
| **०१** | **कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड** | **अंदाजपत्रकीय दराने** |
| ०२ | सोहेल कन्सट्रक्शन नांदेड | ९% जास्त दर |
| ०३ | स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड | ७% जास्त दर |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन ती अंदाजपत्रक दराची आहे.

करिता नागरी **दलीत वस्ती सुधार योजना अंतर्गत प्रभाग क्रं. २३ मध्ये गोयल यांचे घर ते नंदलाल ते श्री ढवळे यांच्या घरापर्यंत तसेच ढवळे यांचे घर ते श्री कांबळे यांच्या घरापर्यंत आरसीसी नाली व सिसि रस्ता करणेसाठी कामारीकर कंन्स्ट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा** ही नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.०८**

नावाशमनपा हद्यीत **प्रभाग क्रं. ३ अंतर्गत शिवनेदी नगर मध्ये २० नग ७०W सोडियम पथदिवे पुरवठा करुन बसविण्यात आले आहे** सदरील काम अत्यंत तातडीने करुन घ्यावयाचे असल्याने निवदा न मागविता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (विधुत विभागाच्या) डीएसआर २०११-१२ नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक दरावर **मे. नांदेड इंजिनिअरिंग कंपनी नांदेड** यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी **रुपये ७१,९००/-** (अक्षरी रुपये एकात्तर हजार नऊशे फक्त) एवढा खर्च झालेला आहे.

करिता या कामास **मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ च्या अनुसूची ड प्रकरण ५ कलम २ अन्वये कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यासाठी सदरचा प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.**

**सभापती** मागील सभेत वियुत विभागाचे उप अभियंत्यास कोणकोणत्या प्रभागात लाईट फिटींग बसविण्यात आली याची माहिती देण्यासाठी सांगण्यात आले होते ती माहिती देण्यात आलेली नाही.

**आयुक्त** उपअभियंता यांनी बसविण्यात आलेल्या लाईट फिटींगची माहिती सभापतींना द्यावी. स्मार्टसिटी प्रस्तावा अंतर्गत विद्युत विभागाचा ४८ कोटीचा डिपीआर केला होता परंतु या स्मार्टसिटी योजनेत महानगरपालिकेचा समावेश झालेला नाही. शहरात जवळपास २८ हजार विद्युत पोल आहेत. शहरात आधुनिक पध्दतीने विद्युतीकरण करण्यासाठी जवळपास ४८ कोटीचा खर्च येत आहे, भविष्यात ड वर्ग महानगरपालिका हध्दीत भूमिगत केबल लाईन टाकण्याचा प्रस्ताव असून लाईट फिटीग पोल कसे उभे करावे याबाबतचे नियोजन आतापासून करणे आवश्यक आहे. तसेच केंद्र शासनाचा उर्जा बचत योजने अंतर्गत सौर उर्जावर एलइडी विद्युत दिवे बसवावयाचे असून प्रायोगिक तत्वावर विशिष्ट भागात सौर उर्जावर चालणारे एलइडी लाईट बसविण्याची योजना उपअभियता यानी हाती घ्यावी. शहरात सौर उर्जावर ५००० हजार एलईडी बसविणयाचे उदिष्ट ठरविण्यात यावे.

**उमेश चव्हाण** एमएसईबी विना परवानगीने महानगरपालिकेच्या जागेवर डिपी व पोल उभे करते त्यांना त्याचे भाडे मागविण्यात यावे व अशी डिपी व पोल उभे करण्यापुर्वी महानगरपालिकेची परवानगी घेण्यासाठी एमएसईबीला बंधनकारक करावे.

**आयुक्त** एमएसईबीचा एखादा पोल शिफट करावयाचा असेल तर तो पोल शिफट करण्यासाठी महानगरपालिकेस रु.२० हजार भरण्याची मागणी करण्यात येते. त्यामूळे उपअभियंता (विद्युत) यांनी एमएसईबीला महानगरपालिका हध्दीत महानगरपालिकेच्या जागेवर विद्युत ट्रान्सफार्मर व पोल उभे करण्यापुर्वी महानगरपालिकेची पुर्व परवानगी घेतल्याशिवाय डिपी व पोल उभे करु नये अशा प्रकारचे लेखी पत्र द्यावे.

**सभापती** आयुक्तांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.१९९** **ठराव**

नावाशमनपा हद्दीत **प्रभाग क्रं. ३ अंतर्गत शिवनेदी नगर मध्ये २० नग ७०W सोडियम पथदिवे पुरवठा करुन बसविण्यात आले आहे** सदरील काम अत्यंत तातडीने करुन द्यावयाचे असल्याने निवदा न मागविता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (विधुत विभागाच्या) डीएसआर २०११-१२ नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक दरावर **मे. नांदेड इंजिनिअरिंग कंपनी नांदेड** यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी **रुपये ७१,९००/-** (अक्षरी रुपये एकात्तर हजार नऊशे फक्त) एवढा खर्च झालेला आहे.

करिता या कामास **मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ च्या अनुसूची ड प्रकरण ५ कलम २ अन्वये कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता ही नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.**

**विषय क्रं.०९**

नावाशमनपा हद्दीत **झोन क्रं. ब अंतर्गत विविध भागात १५ नग नविन ७ व्हॅंड सोडियम पथदिवे पुरवठा करुन बसविण्यात आले आहे** सदरील काम अत्यंत तातडीने करुन द्यावयाचे असल्याने निवदा न मागविता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (विधुत विभागाच्या) डीएसआर २०११-१२ नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक दरावर **मे. नांदेड इंजिनिअरिंग कंपनी नांदेड** यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी **रुपये ५३,६८५/-** (अक्षरी त्रेपन हजार सहाशे पंच्यांशी फक्त) एवढा खर्च झालेला आहे.

करिता या कामास **मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ च्या अनुसूची ड प्रकरण ५ कलम २ अन्वये कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यासाठी सदरचा प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.**

**सभापती** आयुक्तांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. २००** **ठराव**

नावाशमनपा हद्दीत **झोन क्रं. ब अंतर्गत विविध भागात १५ नग नविन ७ व्हॅंड सोडियम पथदिवे पुरवठा करुन बसविण्यात आले आहे** सदरील काम अत्यंत तातडीने करुन द्यावयाचे असल्याने निवदा न मागविता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (विधुत विभागाच्या) डीएसआर २०११-१२ नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक दरावर **मे. नांदेड इंजिनिअरिंग कंपनी नांदेड** यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी **रुपये ५३,६८५/-** (अक्षरी त्रेपन हजार सहाशे पंच्यांशी फक्त) एवढा खर्च झालेला आहे.

करिता या कामास **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या अनुसूची ड प्रकरण ५ कलम २ अन्वये कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता ही नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.**

**विषय क्रं.१०**

नावाशमनपा हद्दीत **सर्व झोन अंतर्गत विविध भागात एकूण २७ नग ७० व्हॅट सोडियम पथदिवे व ३३ नग २२x२४ व्हॅट टी-५ पथदिवे पुरवठा करुन बसविण्यात आले आहे** सदरील काम अत्यंत तातडीने करुन द्यावयाचे असल्याने निवदा न मागविता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (विधुत विभागाच्या) डीएसआर २०१३-१४ नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक दरावर **मे. नॅशनल इलेक्ट्रीकल इंजिनिअर नांदेड** यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी **रुपये २,२२,९३९/-** (अक्षरी रुपये दोन लाख बाविस हजार नऊशे एकोनचाळीस फक्त) एवढा खर्च झालेला आहे.

करिता या कामास **मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ च्या अनुसूची ड प्रकरण ५ कलम २ अन्वये कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यासाठी सदरचा प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.**

**सभापती** आयुक्तांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.२०१** **ठराव**

नावाशमनपा हद्दीत **सर्व झोन अंतर्गत विविध भागात एकूण २७ नग ७० व्हॅट सोडियम पथदिवे व ३३ नग २२x२४ व्हॅट टी-५ पथदिवे पुरवठा करुन बसविण्यात आले आहे** सदरील काम अत्यंत तातडीने करुन द्यावयाचे असल्याने निवदा न मागविता महाराष्ट्र शासनाच्या

सार्वजनिक बांधकाम (विधुत विभागाच्या) डीएसआर २०१३-१४ नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक दरावर **मे. नॅशनल इलेक्ट्रीकल इंजिनिअर नांदेड** यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी **रुपये २,२२,९३९/-** (अक्षरी रुपये दोन लाख बाविस हजार नऊशे एकोनचाळीस फक्त) एवढा खर्च झालेला आहे.

करिता या कामास **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या अनुसूची ड प्रकरण ५ कलम २ अन्वये कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.**

**विषय क्रं.११**

नावाशमनपा हद्दीत **गुरु-ता-गद्दी सोहळया अंतर्गत मोनुमेन्टस (पुतळया जवळील) दुरुस्ती करणेसाठी** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी केली असता सदरचे काम करणे आवश्यक असून सदर कामासाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१४-१५ नुसार **रुपये १,५५,२८६/-** चे अंदाजपत्रक सादर करुन सदर काम **सोहेल कन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले.

कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर सोहेल कन्सट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रुपये १,५५,२८६/- यास **महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ च्या अनुसूची ड प्रकरण ५ कलम २ अन्वये कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यासाठी सदरचा प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.**

**सभापती** शहरातील सर्व महापुरुषांचे पुतळयाची दुरुस्ती व रंगरगोटी करण्यात यावी.

**आयुक्त** शहरातील सर्व महापुरुषांचे पुतळयाचा सर्व्हे करुन त्या ठिकाणी काय काय दुरुस्ती करणे आवश्यक आहे त्यांचे अंदाजपत्रक तयार करुन ते दुरुस्त करण्याची कार्यवाही सबंधित अभियत्यांनी करावी. काही पुतळयाचे बाजूचे लोखंडी कठडे गंजलेले असल्यामूळे त्यास रंग देण्यात यावा.

**सभापती** आयुक्तांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.२०२** **ठराव**

नावाशमनपा हद्दीत **गुरु-ता-गद्दी सोहळया अंतर्गत मोनुमेन्टस (पुतळया जवळील) दुरुस्ती करणेसाठी** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी केली असता सदरचे काम करणे आवश्यक असून सदर कामासाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१४-१५ नुसार **रुपये १,५५,२८६/-** चे अंदाजपत्रक सादर करुन सदर काम **सोहेल कन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले.कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर सोहेल कन्सट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रुपये १,५५,२८६/- यास **महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ च्या अनुसूची ड प्रकरण ५ कलम २ अन्वये कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता ही नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.**

**विषय क्रं. १२**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत झोन क्रं. C मध्ये पाणी पुरवठा व मलनिस्सारण देखभाल दुरुस्ती करिता** नियुक्त ठेकेदारा मार्फत (AMRC) अंतर्गत कामे करुन घेण्यात येत आहे. झोन क्रं. C मे. ईश्वरदास अन्ड कंपनी यांनी दिनांक ०९.०९.२०१५ पासुन देखभाल दुरुस्तीचे कामे बंद केलेली आहेत. उपअभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या अहवालानुसार सदरील ठिकाणी **मॅफ्को रोड मुख्य रस्त्यावर ड्रेनेज चौकअप झाल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्यामुळे सदर काम तातडीचे व आवश्यक असल्यामुळे मंजुर दरावर मे. स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड यांचे मार्फत तातडीने करुन घेण्यात आले** त्यासाठी **रुपये १०,४२,५७५/-** (दहा लक्ष बेचाळीस हजार पाचशे पंच्याहत्तर फक्त) खर्च झाला असून सदरील खर्च मनपा देखभाल दुरुस्ती या लेखा शिर्षकातुन खर्च करण्यात येतो व सदरील काम मे. स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड यांनी केल्यामुळे त्यास **कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यासाठी सदरचा प्रस्ताव स्थायी समिती समोर समोर मान्यतेस्तव सादर.**

**विनय गुर्रम** या प्रस्तावास मान्यता देण्यात येवू नये. या प्रस्तावास मान्यता देण्यास आमचा विरोध आहे. मे. स्वान इन्फ्रास्ट्रक्चर कंत्राटदार कोण आहे त्यांचे नांव सांगण्यात यावे.

**आयुक्त** सार्वजिनक काम करण्यासाठी घेतलेले कंत्राटदाराचे कंपनीचे व्यकतीचे नाव काय आहे कंपनीचे मालक कोण आहे हे स्थायी समितीला सांगण्याची आवश्यकता नाही.

**उमेश चव्हाण** मे. स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड यांनी सदरचे काम केलेले आहे.त्यामूळे या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**विनय गुर्रम** मे. स्वान इन्फ्रास्ट्रक्चर यांचे नावावर श्री जूनेद हे काम करतात ते काम बरोबर व क्वालीटीत करीत नसतांना याच कंत्राटदाराकडून कामे का करुन घेण्यात येत आहे. दुसरे कंत्राटदार काम करु शकत नाही काय, माझ्या प्रभागात ५-६ महिण्यापासुन रस्त्यावरुन मलनिस्सारणाचे घाण पाणी वाहत असून ते नागरीकांच्या स्वयंपाक धरापर्यंत जात असल्यामूळे नागरीकांना मोठया प्रमाणात त्रास होत आहे म्हणून सदरील पाईप लाईन दुरुस्ती करण्यासाठी मी लेखी तक्रार केलेली आहे त्यासोबत फोटोही दिलेले आहे. नागरीक मागणी करीत आहे परंतु हे काम करण्यात येत नाही .जुनेद कंत्राटदार बरोबर काम करीत नसल्यामूळे त्यांना ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्यात यावे. या प्रस्तावास मान्यता देण्यास आमचा विरोध आहे. केसीपी कंपनीच्या निष्काळजीपणामूळे दोन तिन अपघात होवून त्यात तीन इसमाचा मृत्यू झालेला आहे त्यांनाही ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्यात यावे.

**आयुक्त** महानगरपालिका सार्वजनिक कामासाठी कंत्राटदाराना काम देते हे काम करीत असतांना काही मानवीय चुक होवून दुर्घटना घडून काही जिवित हानी झाली त्यास महानगरपालिका जबाबदार नसते.काम करीत असताना जिवित हानी झाल्यास नियमाप्रमाणे गुन्हा नोंद होतो,त्याची चौकशी होवून. शासनाच्याही मोठ मोठया कामात जसे धरणे, पुल, रस्त्याचे कामाचे कंत्राटमध्ये असे अपघात झालेले आहे त्यामूळे त्या कत्रांटदाराना ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्यात येत नाही. किंवा त्यांची पत (रेप्युटेंशन) खराब करण्यात येते नाही. निविदा मॅन्यूयल प्रमाणे कोणत्याही कंत्राटदाराने काम अर्धवट सोडून दिले वारंवार सुचना करुनही कामे विहित कालावधीत पुर्ण करीत नाही अशा विविध कारणामूळे आयुक्तांच्या शिफारशीनूसार संबधित कंत्राटदारास ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्याचे अधिकार हे महानगरपालिकेस आहे स्थायी समितीला नाही.

**उमेश चव्हाण** श्री विनय गुर्रम यांचा विरोध नोंदवून या प्रस्तावास बहुमताने मान्यता देण्यात यावी.

**सभापती** श्री विनय गुर्रम यांचा विरोध नोंदवून आयुक्तांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. २०३** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत झोन क्रं. C मध्ये पाणी पुरवठा व मलनिस्सारण देखभाल दुरुस्ती करिता नियुक्त ठेकेदारा मार्फत (AMRC) अंतर्गत कामे करुन घेण्यात येत आहे. झोन क्रं. C मे. ईश्वरदास अन्ड कंपनी यांनी दिनांक ०९.०९.२०१५ पासुन देखभाल दुरुस्तीचे कामे बंद केलेली आहेत. उपअभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या अहवालानुसार सदरील ठिकाणी **मॅफ्को रोड मुख्य रस्त्यावर ड्रेनेज चौकअप झाल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्यामुळे सदर काम तातडीचे व आवश्यक असल्यामुळे मंजुर दरावर मे. स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड यांचे मार्फत तातडीने करुन घेण्यात आले** त्यासाठी **रुपये १०,४२,५७५/-** (दहा लक्ष बेचाळीस हजार पाचशे पंच्याहत्तर फक्त) खर्च झाला असून सदरील खर्च मनपा देखभाल दुरुस्ती या लेखा शिर्षकातुन खर्च करण्यात येतो व सदरील काम मे. स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड यांनी केल्यामुळे त्यास **कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता ही नावाशमनपा स्थायी समितीची सभा बहुमताने देते,श्री विनय गुर्रम यांचा विरोध नोंदविण्यात येतो. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.**

**विषय क्रं.१३** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दी मध्ये विविध ठिकाणी ई. टॉयलेट उभारल्यास ते शहरवासीयांच्या आरोग्याच्या व शहर स्वच्छतेच्या दृष्टीकोणातुन सोईचे होईल. ई-टॉयलेट हे पूर्णपणे स्वयंचलित असतात. यातील संपूर्ण यंत्रणा ही Sensor Base असून याचा वापर करणा-या व्यक्तीने ठरावीक रक्कमेचे नाणे Coin Box मध्ये टाकले की आपोआप पूर्ण यंत्रणा कार्यान्वीत होते. जसे दार उघडणे, लाईट सुरु होणे, Floor Autoflash होणे इत्यादी. या टॉयलेट उभारणीकरीता जागाही अतिशय कमी वापरात येते. महीलांकरीता सॅनिटरी नॅपकीन, वेंडीग मशीन, वॉश बेसीन, आरसा इत्यादी सुविधांचा अंर्तभाव ई-टॉयलेट मध्ये करता येऊ शकतो. Public Friendly अशा या ई-टॉयलेटची उभारणी संपुर्ण शहरात आवश्यकतेनुसार ठिक ठिकाणी केल्यास शहर वासीयांना अत्यंत सोईचे होईल. परंतु तुर्तास प्रयोगिक तत्वावर शहरात दोन ठिकाणी ई-टायलेटसाठी जागा निश्चित करुन बांधकाम करणे व त्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करते.

**सुचक :-** इशरत फातेमा अ. शमीम **अनुमोदक:-** कदम गंगाबाई

**सभापती** सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.१०४** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दी मध्ये विविध ठिकाणी ई. टॉयलेट उभारल्यास ते शहरवासीयांच्या आरोग्याच्या व शहर स्वच्छतेच्या दृष्टीकोणातुन सोईचे होईल. ई-टॉयलेट हे पूर्णपणे स्वयंचलित असतात. यातील संपूर्ण यंत्रणा ही Sensor Base असून याचा वापर करणा-या व्यक्तीने ठरावीक रक्कमेचे नाणे Coin Box मध्ये टाकले की आपोआप पूर्ण यंत्रणा कार्यान्वीत होते. जसे दार उघडणे, लाईट सुरु होणे, Floor Autoflash होणे इत्यादी. या टॉयलेट उभारणीकरीता जागाही अतिशय कमी वापरात येते. महीलांकरीता सॅनिटरी नॅपकीन, वेंडीग मशीन, वॉश बेसीन, आरसा इत्यादी सुविधांचा अंर्तभाव ई-टॉयलेट मध्ये करता येऊ शकतो. Public Friendly अशा या ई-टॉयलेटची उभारणी संपुर्ण शहरात आवश्यकतेनुसार ठिक ठिकाणी केल्यास शहर वासीयांना अत्यंत सोईचे होईल. परंतु तुर्तास प्रयोगिक तत्वावर शहरात दोन ठिकाणी ई-टायलेटसाठी जागा निश्चित करुन बांधकाम करणे व त्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करते.

**विषय क्रं.१४** **अपिल** **दिनांक ०४.०१.२०१६**

**प्रति,**

**मा. सभापती,**

स्थायी समिती,

नावाशमनपा नांदेड

**विषय:-** मा.आयुक्त नावाशमनपा नांदेड यांनी बजावलेल्या निलंबन आदेशा विरुध्द अपिल

**अपिलकर्ता :- मनोहर शिवाजीराव दंडे, उपअभियंता बीएसयुपी विभाग नावाशमनपा नांदेड**

संदर्भ :- मा. आयुक्त नावाशमनपा नांदेड यांचे आदेश जा.क्रं. साप्रवि/आस्था-५/९८११/१५ दिनांक २९.१०.२०१५

**आदरणी महोदया,**

**प्रस्तावना**

उपरोक्त प्रकरणी सविनय सादर की, दिनांक २९.१०.२०१५ रोजी भ्रमणध्वनी वरुन प्राप्त आदेशाचे मानवी आवाक्या बाहेरील कारणामुळे पालन करु न शकल्यामुळे मला, मा. आयुक्तांनी संदर्भीय आदेशाव्दारे मनपा सेवेतुन तात्काळ निलंबीत केले आहे. वस्तुस्थिती माहिती करुन न घेता एकतर्फी निर्णय घेऊन करण्यात आलेले निलंबन निर्दयीपणाचे व कारण नसतांना व्यथीत करणारे असल्याने कृपया मानवी दृष्टीकोन ठेवुन खालील कारणास्तव त्या आदेशा विरुध्द माझे प्रस्तुत अभिवेदन स्वीकारुन मला न्याय द्यावा हि सविनय प्रार्थना.

१) महोदया, मी १५ वर्षा पासुन मनपा सेवेत आहे या कालावधीत मी अत्यंत प्रामाणिकपणे व सचोटीने माझ्या कर्तव्य जबाबदारीचे पालन केले वरिष्ठांना आक्षेपार्ह वाटणारे वर्तन माझ्या कडून कधी ही घडलेले नाही. दिनांक २९.१०.२०१५ रोजी मा. आयुक्त यांच्या ब्रम्हपुरी येथील कामाची स्थळ पहाणी दौ-याची सुचना मला भ्रमणध्वनीवरुन प्राप्त झाली. तथापी मला असलेल्या मुळव्याधीच्या शारीरीक व्याधीने मी संत्रस्त होतो अव्याहत सुरु असलेल्या रक्त स्त्रावावर नियंत्रण करण्यासाठी मी डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचाराधिन होतो.

माझी शारीरिक असहाय्यता लक्षात घेऊन व डॉक्टरांच्या सल्यावरुन मी एसएमएस व्दारे माझे असहाय्यता मा. कार्यकारी अभियंता श्री कांबळे व कार्यालय अधिक्षक श्री बंडोपंत उत्तरवार यांना अवगत केली. माझी व्याधी व त्यामुळे निर्माण झालेली माझी असहाय्य अवस्था विचारात घेवून मला मनपा प्रशासना कडुन सहानुभुती व माणुसकी पूर्ण वागणुक मिळेल अशी अपेक्षा असतांना मा. आयुक्तांनी संदर्भीय एआदेशाव्दारे मला मनपा सेवेतुन तात्काळ निलंबीत करुन अमानवी वर्तनाचा साक्षात्कार घडवीला.

मा. आयुक्तांची ही कृती धक्कादायक व माझ्या सामाजीक प्रतिष्ठेला, अकारण व शुल्लक बाबी वरुन कलंकीत करणारी तर होतीच तथापी त्याचा माझ्या कुटूंबीयावर अकल्पीत आघात झाला आहे.

महोदया, चुक आणि गुन्हा यांच्या सीमा रेषा अत्यंत अस्पष्ट असतात अशा वेळी सदसद विवेक बुध्दीने त्यातील फरक ओळखुन निर्णय नाही घेतला तर मानवी चांगुलपणा धोक्यात येतो असे म्हणतात आजतागायत निष्ठापुर्वक सेवा बजावुन ही माझ्या शारीरिक असाहयतेची योग्य दाखल न घेता प्रशासन जर मला अशी अमानवी स्वरुपाची वागणुक देत असेल तर इतरांनी त्या पासुन काय बोध घ्यावा ?

मा. आयुक्तांनी मी निदर्शनास आणलेली वस्तुस्थिती तपासण्याची तसदी ही घेतली नसावी असे दिसते किमान निरापराधावर अन्याय होऊ नये म्हणुन तरी त्यांनी आपल्या विश्वासु माध्यमा मार्फत माझ्या म्हणण्याची सत्यता पडताळली असती तर मला वप माझ्या कुटूंबीयांना अकारण व्यथीत होण्याची वेळ आली नसती. मा. आयुक्तांनी वस्तुस्थिती न जाणुन घेता घेतलेला निर्णय एकतर्फी व टोकाला जाऊन घेतलेला असुन मनपा कर्मचा-यात निष्ठाहीनता निर्माण होण्यास प्रेरणा देणारा असल्याने गौण स्वरुपाच्या दूषणा पोटी त्यांनी केलेले निलंबन समर्थनीय नसल्याने कृपया माझ्या प्रस्तुत अपिलावर मानवी दृष्टीकोणातुन विचार करुन माझे निलंबन रद्यबातल ठरवावे ही प्राथना.

प्रसंगवश आपले लक्ष, म.शा.सा.प्र.वि विभागीय चौकशी नियम पुस्तीका (चौथी आवृत्ती) १९१ च्या प्रकरण दोन परिच्छेद २-१ कडे वेधण्यात येते या नियमामध्ये शासनाने असे स्पष्ट नमूद केले आहे की, केवळ समर्थनीय ठरु शकेल अशा परिस्थितीतच नि:संदिग्ध व निर्विवाद पुराव्या आधारे प्रथम दर्शनी बडतर्फ किंवा सेवेतुन काढून टाकण्या सारखी शिक्षा लादण्या योग्य बाब असल्या शिवाय निलंबनाचा आदेश देऊ नये. मा. उच्च न्यायालयाने देखील डॉ. के.सी. आझाद विरुध्द हिमाचल प्रदेश शासन-१९९१ एस.एल.आर.३२६ प्रकरणी दिलेल्या निवाडयात हेच स्पष्ट केले आहे की, निलंबन करण्याची शक्ती स्वेच्छाधिन असते ती योग्य विचार करुन वापरली पाहीजे बाहय व दूरगामी संबंध असलेल्या परिस्थितीत भेदभाव व पक्षपाती बुध्दीने निलंबनाचा आदेश काढलेला नसावा, असे असतांना शारीरिक व्याधीन पिडीत अवस्थेत क्षेत्रीय भेटीस उपस्थित राहू शकलो नाही. एवढया किरकोळ आणि गोण स्वरुपाच्या दुषणाखाली थेट निलंबनाची कार्यवाही करणे अमानवी पणाचे वाटते. सबब निलंबनाचे आदेश रद्द करुन बाजुस सारण्यात यावे ही विनंती.

आदरपुर्वक सादर.

आपला विश्वासु,

स्वाक्षरीत/-

**मनोहर शिवाजीराव दंडे, उप अभियंता**

**प्रशासकीय टिप्पणी**

श्री मनोहर शिवाजीराव दंडे, प्र. उपअभियंता यांना मा. आयुक्त हे दिनांक २९.१०.२०१५ रोजी न्यु ब्रम्हपुरी येथील बिएसयुपीच्या कामाच्या तपासणी करण्यासाठी स्थळावर गेले असता संबंधीत हे बिएसयुपी कामाच्या साईटवर गैरहजर होते सदरील ठिकाणी कामात अनियमित्ता झाली असल्याचे निदर्शनास आल्याने श्री मनोहर शिवाजीराव दंडे यांना कामाच्या तपासणीसाठी बोलवण्यात आले त्यांना याबाबत पुर्व सुचना असुनही ते कामावर गैरहजर होते. मा. आयुक्त हे साईटवर दोन तपास होते तरीपण संबंधीत दोन तासानंतरही बिएसयुपीच्या साईटवर गैरहजर होते. संबंधीताने कर्तव्यात कसुरी केली ही बाब शिस्त व नियमाविरुध्द आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे कलम (४) पोटकलम (१) अन्वये श्री मनोहर शिवाजीराव दंडे प्र. उपअभियंता यांना कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/ साप्रवि/आस्था-५/९८११/१५ दिनांक २९.१०.२०१५ अन्वये निलंबीत करण्यात आले. निलंबन प्रकरणी संबंधीताविरुध्द दोषारोप जोडपत्र १ ते ४ सादर करणेसाठी कार्यवाही अभियंता, बिएसयुपी विभाग, मनपा नांदेड यांना कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-५/११८११/१५ दिनांक ०१.१२.२०१५ अन्वये कळविण्यात आलेले असुन ते अद्याप अप्राप्त आहे तसेच डोअर लॉक घरकुलांची कामे विना परवाना चालु करणे व कामातील अनियमीतता या प्रकरणात श्री मनोहर दंडे यांचा तत्कालीन प्रभारी उप अभियंता या नात्याने सहभाग असल्याने त्यांनाही यासाठी दोषारोप जोडपत्र देण्यात येत आहेत.

तसेच या प्रकरणात चौकशी करण्यात येत असुन जे अधिकारी/कर्मचारी यात दोषी आढळतील त्यांचेविरुध्द सुध्दा कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५६ मधील तरतुदीनुसार चौकशीनंतर शास्ती लादतांना बडतर्फ केले असल्यास किंवा खालच्या पदावर आणण्यात आले असल्यास या शास्तीविरुध्द अपील करता येते. असा अधिकारी किंवा कर्मचारी यांच्यावर असलेल्या आरोपाची

चौकशी होईपर्यंत त्या अधिका-यांचे किंवा कर्मचा-यांचे निलंबन हे शास्ती असल्याचे समजण्यात येणार नाही निलंबन आदेशाविरुध्द अपील करण्याची तरतुद नाही त्यामुळे संबंधीतांचे निलंबन रद्द करता येणार नाही.

**उमेश चव्हाण** अपिल मंजुर करण्यात यावे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार आयुक्तांनी नियमानुसार वैधानिक कार्यवाही करावी

**विनय गुर्रम** अपिलास मान्यता देण्यात यावी.

**सभापती** अपिल मंजुर करण्यात येते महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार आयुक्तांनी नियमानुसार वैधानिक कार्यवाही करावी व हा ठराव याच सभेत

**ठराव क्रं.२०५** **ठराव**

श्री मनोहर शिवाजीराव दंडे, निलंबित उप अभियंता यांनी निलंबन आदेश क्रं. नावाशमनपा साप्रवि/आस्था-५/९८११/१५ दिनांक २९.१०.२०१५ रद्द करण्या बाबत केलेले अपिल ही स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार आयुक्तांनी नियमानुसार वैधानिक कार्यवाही करावी असे ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**विषय क्रं.१५** **अपिल** **दिनांक ०४.०१.२०१६**

**प्रति,**

**मा. सभापती,**

स्थायी समिती,

नावाशमनपा नांदेड

**विषयः-** <u>मा.आयुक्त नावाशमनपा नांदेड यांनी बजावलेल्या निलंबन आदेशा विरुध्द अपिल</u>

**अपिलकर्ता** :- सुनिल भास्करराव देशमुख, उपअभियंता अमृत विभाग नावाशमनपा नांदेड

**संदर्भ** :- मा. आयुक्त नावाशमनपा नांदेड यांचे आदेश जा.क्रं. साप्रवि/आस्था-५/११९२२/१५ दिनांक १४.१२.२०१५

**आदरणी महोदया,**

**<u>प्रस्तावना</u>**

उपरोक्त विषयी सविनय सादर की, नावाशमनपा नांदेड हद्यीत बीएसयुपी योजने अंतर्गत घरकुलाची कामे विना परवाना चालु केल्या बाबत व कामाचा प्रगती अहवाल ससादर न केल्यामुळे प्रकरल्पाच्या कामात प्रगती दिसुन आली नाही म्हणुन त्या बाबत जबाबदार धरुन मा. आयुक्तांनी मला संदर्भात नमुद आदेशाव्दारे मनपा सेवेतुन तडकाफडकी निलंबीत केले आहे.

संदर्भीय निलंबन आदेश काढण्यापुर्वी वर नमुद दोषारोप समाविष्ठ असलेली कारणे दाखवा नोटीस दि. ०९.११.२०१५ रोजी माझ्यावर बजावण्यात आली त्यावर दि. ३०.११.२०१५ रोजी स्पष्टीकरण सादर करतांना मी ही वस्तुस्थिती संदर्भासह निदर्शनास आणली होती की, विनापरवाना सुरु करण्यात आलेल्या घरकुलांच्या कामास मी जबाबदार नसुन ही बाब निदर्शनास आल्यानंतर मी जातीने लक्ष घालुन मा. आयुक्तांच्या निदर्शनास आणली तसेच ही कामे सुरु करण्यासाठी सर्वसाधारण सभेने पारीत केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने मा. आयुक्तांची परवानगी घेण्या करिता तत्संबंधीत प्रस्तावाची संचीका रीतसर योग्य मार्गाने सादर केली याचे अभिलेखीय पुरावे मनपाच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. मा. आयुक्तांनी मात्र या संचीकेवर कोणताही निर्णय न घेता ती विभागास परत केली.

विशेष नमुद करण्याची बाब म्हणजे त्यांच्या परवानगी शिवाय कामे सुरु करण्यास प्रत्यक्ष जाबदार असणारे अधिकारी कोण हे मा. आयुक्तांना ज्ञात आहेत तथापी त्यांना कार्यवाहीतून सुट देऊन त्यांनी मला जबाबदार धरून तात्काळ निलंबीत केले जेंव्हा की मी माझी बाजु मांडणारा सविस्तर व समर्पक खुलासा पुरावा संदर्भासह त्यांना सादर केला होता. तथापी तो पहाण्याची ही तसदी न घ्तेता त्यांनी एकतर्फी निर्णय घेऊन काढलेले माझे निलंबन आदेश पक्षपात व भेदभाव करणारे असल्याने व सर्वाप्रती समान न्याय तत्वाचा भंग करणारे असल्याने ते रद्द करण्या योग्य ठरतात सबब खालील कारणास्तव माझे अपील विचारात घेऊन आदेश रद्द करून मला सेवेत पुनःस्थापीत करावे ही सविनय प्रार्थना.

१) मा. आयुक्तांच्या दिनांक ०९.११.२०१५ च्या नोटीस मध्ये नमुद डोरलॉक लाभार्थीच्या घरकुलांची कामे त्यांची परवानगी न घेता मी सुरु केली नाहीत उलट मी माझ्या निदर्शनास न आणता माझ्या परस्पर सुरु करण्यात आली ही बाब मा. आयुक्तांनी चांगल्याप्रकारे ज्ञात आहे व याच माहितीवरुन त्यांनी प्रकल्प व्यवस्थापकावर दिनांक २६.११.२०१५ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. त्यची छायाप्रती सोबत जोडली आहे

मा. आयुक्तांनी या नोटीस मध्ये स्पष्ट नमुद केले आहे की न्यु ब्रम्हपुरी येथील ८० डोरलॉक घरकुलांची कामे सुरु करण्यापुर्वी सदर बाब कार्यकारी अभियंता यांच्या निदर्शनास आणुन देणे आवश्यक होते आपण सदरची बाब त्याच वेळी निदर्शनास आणुन दिली असती तर तांत्रीक अडचणी निर्माण झाल्या नसत्या वेळीच दक्षता घेऊन निदर्शनास आणुन देणे ही बाब प्रकल्प व्यवस्थापकाच्या कर्तव्य सुचीत मोडते.

मा. आयुक्तांनी प्रकल्प व्यवस्थापकाच्या नोटीस मध्ये त्यांच्या कर्तव्य सुचीचा उल्लेखासह नमूद केलेले वरील वाक्य हेच निर्विवादरित्या सिध्द करते की, डोरलॉक घरकुलाची कामे माझ्या निदर्शनास न आणता माझ्या परस्पर सुरु करण्यात आली व त्या बाबत मी पूर्णतः अनभिज्ञ होतो. असे असतांना त्या विषयी मला जबाबदार धरणे व निलंबीत करणे कदापी न्यायोचित ठरु शक्त नाही म्हणुन माझे निलंबन आदेश रद्दबातल ठरण्या योग्यक आहेत सबब ते रद्द करावे ही सविनय विनंती आहे.

२) प्रकल्प संचालकांनी कारणे दाखवा नोटीस देतांना मा. आयुक्तांनी घरकुलांच्या कामाची पर्यवेक्षीय जबाबदारी असणा-या कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांना ही कार्यवाहीतून सुट देण्याचा केलेला पक्षपात देखील अनाकलनीय आहे. कारण कामाचे रेखांकन (Mark Out) लाभाधारकाची ओळख व महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका परिच्छेद-२२० नुसार मापदंडानुसार काम करवुन घेणे ई. बाबी त्यांच्या कर्तव्य सुचीत मोडतात असे असतांना प्रकल्प व्यवस्थापकासह कामाची अमलबजावणीस जबाबदार असणा-या या दोन्ही अभियंता कामा बाबत यर्त्कींचीत ही जबाबदार न धरता त्यांनी माझ्या परस्पर व आयुक्तांच्या परवानगी शिवाय सुरु केलेल्या कामाची जबाबदारी माझी कशी येते ? ही बाब कदापी न्यायसंगत ठरत नाही सबब निलंबन आदेश रद्द होण्या योग्य ठरतात.

३) मनपा अंतर्गत इतर प्रकल्पा अंतर्गत स्थलांतरीत क्षेत्रावर देखील अशी कामे मा. आयुक्तांची परवानगी न घेता त्यांचे परस्पर सुरु करण्यात आली उदा, गोरक्षणसह इतर प्रकल्प ही बाब मनपा प्रशासनाला ज्ञात आहे. तसेच माझ्या पदभार स्वीकृती पुर्वी तत्कालीन कार्यकारी अभ्भयंता यांनी देखील विनापरवानगी डोरलॉक घरकुलाची कामे सुरु केली. अशा डोरलॉक घरकुलांच्या परवान्या शिवाय सुरु केलेल्या कामा बाबत जबाबदारी निश्चित करु इच्छिणा-या कंत्राटदाराची देयके विनाआक्षेप स्वीकारली व अदा देखील केली हे प्रकल्प व्यवस्थापकाच्या वर बजावलेल्या नोटीस मधुन स्पष्ट होते. अशी देयके प्रस्तावीत करणे नियबाहय होते तर ती देयके स्वीकारुन अदा करणे देखील नियमबाहय नाही का ? इथे मा. आयुक्तांनी नियमबाहय कृती करणा-यांना अेका ओळीने ही जाब न विचारणे हा पक्षपातीपणा नाही काय ? कामाशी संबंधीत कनिष्ठ अभियंता व उपअभियंता यांची या नियमबाहय कृती बाबत काहीच जबाबदारी नाही काय ? नसेल तर त्यास मी कसा निलंबन कार्यवाहीस पात्र ठरतो ? याचा न्याय दृष्टीकोणातुन विचार होणे, नि:पक्षपाती व नैसर्गीक न्यायासाठी अनिवार्य ठरते सबब मला न्याय द्यावा हि विनंती.

४) न्यु ब्रम्हपुरी येथील घरकुल बांधकामाचा पदभार माझ्यावर सोपविण्यापुर्वी तो ज्यांचे कडे होता त्यांच्या व माझ्या कार्यकाळातील पूर्ण झालेल्या कामाची विचारण पत्रे सोबत जोउली आहेत माझ्या पुर्वी कार्यरत अभ्भयंत्यांनी (२) वर्षाच्या काळात पूर्ण केलेल्या घरकुलाची संख्या (१४१) एवढी आहे तदनंतर मी कार्यभार स्वीकारल्या अवघ्या एक वर्षात पूर्ण केलेल्या घरकुलांची संख्या (५०७) एवढी आहे. कामाचे हे प्रगती अहवाल प्रकल्प व्यवस्थापकाकडून व नियंतकालीक आढावा बैठकीतून मा. आयुक्तांना प्राप्त आहेत असे असतांना ही एवढा महत्वाचा अभिलेखीय पुरावा नाकारुन मा. आयुक्त कोणत्याही हेतुने प्रेरीत होऊन मला दोषारोपीत करत आहेत व निलंबना सारखी व्थीत करणारी कार्यवाही करीत आहेत ? यवर न्याय विचार होणे अनिवार्य आहे जेंव्हा की ही सर्व कामे प्रकल्प व्यवस्थापक, कनिष्ठ अभियंता उप अभियंता या सर्वांची सामुहीक जबाबदारी आहे मग निलंबनाची कार्यवाही विनापरवाना प्रत्यक्ष काम सुरु करणा-यांना वगळुन माझ्यावरच कशासाठी ? मा. आयुक्तांचा हा भेदभाव व पक्षपात कदापी समर्थनीय ठरु शकत नाही सबब निलंबन आदेश रद्द करुन मला सेवेत पुन:स्थापीत करण्या बाबत सादर विनंती आहे.

५) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग विभागीय चौकशी नियम-१९९१ (चौथी आवृत्ती) च्या प्रकरण दोन परि. २.१ नुसार केवळ समर्थनीय ठरु शकेल अशा परिस्थितीच नि:संदिग्ध व निर्विवाद पुराव्या आधारे प्रथम दर्शनी बडतर्फ किंवा सेवेतुन काढून टाण्या सारखी शिक्षा लादण्या योग्य बाब असल्या शिवाय निलंबनाचा आदेश देऊ नये असे शासन आदेश आहेत. मा. उच्च न्यायालयाने देखील डॉ. के.सी. आझाद विरुध्द हिमाचल प्रदेश शासन-१९९१ एसएलआर ३२६ प्रकरणी दिलेल्या निवाडयात हेच स्पष्ट केले आहे की, निलंबन करण्याची शक्ती स्वेच्छाधिन असते ती योग्य विचार करुन वापरली पाहीजे बाहय व दुरगामी संबंध असलेल्या परिस्थितीत भेदभाव व पक्षपाती बुध्दीने निलंबनाचा आदेश काढलेल्या नसावा.

उपरोक्त तपशीलाच्या पार्श्वभुमीवर ख-या दोषीचे दोष व नियमबाहय वर्तन निदर्शनास येऊन ही त्यांचेवर कोणतीही कार्यवाही न करता जी दुषणे वा दोष मला लागु देखील होत नाहीत त्यासाठी जबाबदार धरुन करण्यात आलेले निलंबन सर्वथा अमानवी व अन्यायकारक असल्याने सर्वाप्रती समान न्यायाच्या तत्वाचा विचार करुन मला व माझ्या कुटूंबीयांना अकारण व्यथीत करणारे निलंबन रद्द बातल केल्यास मी आपला आजन्म ॠणी राहीन.

आदरपूर्वक सादर.

**आपला विश्वासु,**
**स्वाक्षरीत/-**
**सुनील भास्करराव देशमुख**

**<u>प्रशासकीय टिप्पणी</u>**

श्री सुनिल भास्करराव देशमुख, उपअभियंता यांना न्यु ब्रम्हपुरी येथील बिएसयुपी घरकुल योजने अंतर्गतची कामाबाबत आयुक्तजांची आवश्यक असलेली मान्यता न घेता निर्णय घेणे, डोअर लॉक घरकुलांची कामे विनापरवाना आयुक्तांची मंजुरी न घेता चालु करणे ज्यामुळे मनपाचे अनाधिकृत दायित्व निर्माण करणे, मंजुरीची संचिका स्वत:च्या स्तरावर अनाधिकृतपणे प्रलंबित ठेवणे, योजनेची मुदतवाढ संपत असतांना कामाच्या प्रगती बाबत आयुक्त / उपआयुक्त यांना पगती अहवाल सादर न करणे व प्रकल्प बेजबाबदारपणे हाताळणे या गंभीर बाबी लक्षात घेता त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे कलम (४) पोटकलम (१) अनवये श्री सुनील भास्करराव देशमुख उपअभियंता यांना कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-५/१५, दि. १४.१२.२०१५ अन्वये निलंबीत करण्यात आले आहे निलंबन प्रकरणी संबंधीता विरुध्द दोषारोप जोडपत्र १ ते ४ सादर करणेसाठी कार्यकारी अभ्भयंता बिएसयुपी विभाग मनपा नांदेड यांना कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-५/१२०५४/१५ दिनांक १७.१२.२०१५ अन्वये कळविण्यात आलेले असुन ते अद्याप अप्राप्त आहे.

तसेच या प्रकरणात चौकशी करण्यात येत असुन जे अधिकारी/कर्मचारी यात दोषी आढळतील त्यांचेविरुध्द सुध्दा कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५६ मधील तरतुदीनुसार चौकशीनंतर शास्ती लादतांना बडतर्फ केले असल्यास किंवा खालच्या पदावर आणण्यात आले असल्यास या शास्तीविरुध्द अपील करता येते. असा अधिकारी किंवा कर्मचारी यांच्यावर असलेल्या

आरोपाची चौकशी होईपर्यंत त्या अधिका-यांचे किंवा कर्मचा-यांचे निलंबन हे शास्ती असल्याचे समजण्यात येणार नाही निलंबन आदेशाविरुध्द अपील करण्याची तरतुद नाही त्यामुळे संबंधीतांचे निलंबन रद्द करता येणार नाही.

**उमेश चव्हाण** अपिल मंजुर करण्यात यावे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार आयुक्तांनी नियमानुसार वैधानिक कार्यवाही करावी

**विनय गुर्रम** अपिलास मान्यता देण्यात यावी.

**सभापती** अपिल मंजूर करण्यात येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार आयुक्तांनी नियमानुसार वैधानिक कार्यवाही करावी व हा ठराव याच सभेत

**ठराव क्रं.२०६** **ठराव**

श्री सुनील भास्करराव देशमुख, उप अभियंता यांनी निलंबन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-५/११९२२/१५, दि. १४.१२.२०१५ रद्द करण्या बाबत केलेले अपिल ही स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार आयुक्तांनी नियमानुसार वैधानिक कार्यवाही करावी असे ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विनय गुर्रम** बाफना पर्यत लाईट बसविण्यासाठी मी लेखी निवेदन दिलेले असून त्याप्रमाणे लाईट बसविण्यात यावे.

**उमेश चव्हाण** माझ्या प्रभागातील वाडीया फॅक्ट्री डॉक्टर लाईन परिसरात एक बंद पडलेली विहिर असून त्यावर जाळी नसल्यामूळे मुले पडत आहे आजच एक मुलगा पडला होता त्यास सुखरुप बाहेर काढण्यात आलेले आहे. तरी या विहिरीला लोंखडी जाळी बसविण्यात यावी.

**विनय गुर्रम** आमच्या भागात मोठे नाले असून याही नाल्यावर लोखंडी जाळी बसविण्यात यावी.

**आयुक्त** श्री अधांरे,का.अभियंता यांनी सर्व्हे करुन ज्या ज्या ठिकाणी लोखंडी जाळया बसविणे आवश्यक आहे त्या ठिकाणी लोखंडी जाळया बसविण्याचे अंदाजपत्रक तयार करुन सादर करावे.

**गंगासागर अन्नेवार** माझ्या प्रभागात पाण्याचा प्रश्न आहे.

**आयुक्त** शहरात ब-याच भागात ४-४ व्हॉल्व चालू ठेवून नविन व जून्या पाईप लाईन व्दारे पाणी पुरवठा होत असल्यामूळे काही नागरीकाना पुरेशा दाबाने पाणी पुरवठा होत नाही तर काही ठिकाणी जास्त वेळ पाणी राहून पाणी वाया जात आहे.जास्त वेळ व्हाल्व चालू राहणार नाही,जून्या व नविन या दोनही पाईपलाव्दारे पाणी पुरवठा न करता एकाच पाईप लाईन वरुन पाणी पुरवठा होईल याकडे श्री अधारे, कार्य अभियंता यांनी लक्ष द्यावे. शहरात प्रत्येक महिण्याचे पाणी सोडण्याचे वेळा पत्रक तयार करुन ते एमसीएन न्युज चॅनलवर व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करावे जेणे करुन नागरीकांना त्याची माहिती होइल,

**सभापती** आजच्या सभेचे कामकाज शांततेत पार पडल्याबघ्दल सर्वाना धन्यवाद देवून सभेचे कामकाज सपंल्यामूळे आजची सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
नांवाशमनपा, नांदेड.